


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२४ ■ शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यातील दोन आमदार बिश्नोई गँगच्या 'टार्गेट'वर !

## जिल्ह्यात खळबळ ; आ. भारसाकळें पाठोपाठ आ. साजिद खान यांनाही धमकी

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** आंतरराष्ट्रीय टोळी म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिश्नोई गँगने आता आपला मोर्चा अकोल्याकडे वळविल्याचे तीन दिवसांतील घडामोडींवरून लक्षात येत आहे. एका पाठोपाठ दोन आमदारांना खडणी व धमक्या दिल्या असल्याने पोलिस प्रशासनासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे बिश्नोई गँगचे अकोला कनेक्शन या आधीच उघड झाल्यानंतर आता अकोटचे आ. प्रकाश भारसाकळे यांच्या नावावर २ कोटींची खंडणी मागितल्याची घटना ताजी असतानाच आता अकोला पश्चिमचे आ. साजिद खान पठाण यांना १० कोटींची खंडणीची धमकी दिल्याची बाब शुक्रवारी उघडकीस आली.

भाजपच्या अकोट शहराध्यक्षांना 'सिग्नल' या गोपनीय मॅसेजिंग ॲपद्वारे धमकीचा कॉल आला. हा कॉल बिश्नोई गँगचा मुख्य सूत्रधार शुभम लोणकर याने केल्याचे समोर आले आहे. 'आ. प्रकाश भारसाकळे यांच्याकडून २ कोटी रूपये वसूल करून दे, अन्यथा तुला आणि आमदाराला बघून घेईन', अशा शब्दात लोणकरने शहराध्यक्षांना थेट धमकी दिली होती. हे होत नाही तोच १७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास आ. साजिद खान पठाण यांच्या मोबाईलवर हा कॉल आल्याचे सांगण्यात येते. 'दोन दिवसांत १० कोटी रुपये दे, नाहीतर तुझा गेम करू,' अशा शब्दांत धमकी दिल्याचा आरोप आहे.



### सायबर तज्ज्ञांची घेण्यात येत आहे मदत

हे प्रकरण पोलिस विभागाने गंभीरतेने घेतले असून, धमकीचा कॉल असल्याने सायबर तज्ज्ञांची मदत घेण्यात येत आहे. कॉल रूटिंग, व्हर्चुअल नंबर आणि इंटरनेट कॉलिंग ॲप्सच्या माध्यमातून संपर्क साधला गेला का, याचाही तपास सुरू आहे. जिल्ह्यातील संवेदनशील व्यक्तींच्या सुरक्षेचा आढावा घेण्यास सुरुवात झाली असून कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून खबरदारीचे उपाय करण्यात येत आहेत.

### आमदार पठाण यांच्या सुरक्षेत वाढ

धमकीनंतर तात्काळ आमदार साजिद खान पठाण यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. चार दिवसांपासून त्यांच्या संरक्षणासाठी चार शस्त्रधारी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. यासंदर्भात आमदार पठाण यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्याकडे तक्रार नोंदवली आहे. तपासाबाबत पोलिस आणि आमदार कार्यालयाकडून गोपनीयता पाळली जात आहे.

### बिश्नोई गँग अन् शुभम लोणकर!

अकोट तालुक्यातील नेव्होरी बु. या गावचा मूळ रहिवासी असलेला शुभम लोणकर याचा बिश्नोई गँगशी कसा संबंध आला, अनेक संवेदनशील प्रकरणात त्याचे नावे पुढे आले असून, या प्रकरणाचे स्थानिक पातळीवरील धागेदोरे शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. गेल्या काही काळात देशभरात बिष्णोई गँगच्या कारवायांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, आता त्याची छाया अकोल्यातही पडल्याचे दिसत आहे.

### अमेरिकेवरून कॉल आल्याची प्राथमिक माहिती

आ. साजिद खान पठाण यांना खंडणीच्या धमकीचा कॉल हा अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथून आल्याचे व तो बिश्नोई गँगचा सूत्रधार शुभम लोणकरने केल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरून धमकीचा कॉल आल्यामुळे तपास यंत्रणा अर्लट झाली असून, तपासाने गती घेतली आहे. दरम्यान याची दखल मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून त्यांनी आ. साजिद खान यांना आम्ही तुमच्या पाठीशी असल्याचा धीरही दिल्याची माहिती आहे.

# जन्म दाखल्यांसाठी खोटे शपथ पत्र देणाऱ्यांवर कारवाई होणार



प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला:** निवडणुकीच्या काळात महाराष्ट्र सरकारने १ डिसेंबर २०२५ रोजी अंतिम जीआर काढला. त्या नुसार जन्म प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्जात ज्यांनी खोटी माहिती दिली, खोटे शपथ पत्र दिलेत या सगळ्यांच्या विरोधात कारवाई करावी व त्यांना आरोपी बनवावे असा आदेश दिला आहे. या संदर्भात आज मनपा मध्ये भाजपचे जेष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी महानगरपालिका आयुक्त, तहसीलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी, रामदास पेठ पोलीस स्टेशनचे निरीक्षक तसेच महापौर यांच्यासह बैठक घेतली.

बैठकी नंतर माध्यमांशी बोलताना किरीट सोमय्या म्हणाले, अकोला तहसीलदारांकडे ४००० अर्ज आले होते. त्या अर्जांमध्ये ज्यात पुरावे नाही तसेच खोटे पुरावे जोडण्यात आलेत अशा अर्जांची पंधरा दिवसात स्क्रुटिनी करण्यात येणार व अशा अर्जदारांबाबत पोलीस कारवाई करण्यात येणार. डिसेंबर २०२५ मध्ये महाराष्ट्रात आणखी जन्म प्रमाणपत्र घोटाळा बाहेर आला आहे. त्यात बाहेरील प्रांतातील हजारो अर्ज कॉम्प्युटर सर्वर हॅक करून असे अर्जदार जन्म प्रमाणपत्र घेऊन पळून गेले आहेत. या संदर्भात सखोल चौकशी करण्याचे आयुक्तांनी मान्य केले आहे. १५ हजार ३९७ लोकांना अशाप्रकारे जन्म प्रमाणपत्र दिलं गेलं आहे त्यांचे प्रमाणपत्र पुढील पंधरा दिवसात चेक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

## शक्तिपीठ महामार्गावरून शेतकऱ्यांमध्ये आक्रोश!

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**परभणी :** शेतकऱ्यांना जनावरांसारखे ओढून बाजूला करीत शक्तिपीठ महामार्गासाठी प्रशासनाने प्रचंड पोलिस फौजफाट्यासोबत जबरदस्तीने जमीन मोजणी सुरू केल्याचा प्रकार तालुक्यातील सहजपूर जवळा येथे घडला. यावेळी शेतकरी आक्रोश करीत होते की आम्हाला गोळ्या घाला अन् जमीन मोजा. या शेतकऱ्यांची पोलिसांनी मध्यरात्री धरपकड सुरू केल्याने मोठी खळबळ उडाली होती. प्रशासनाकडून शक्तिपीठ महामार्गासाठी देण्यात आलेल्या नोटिसा शेतकऱ्यांनी स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर शुक्रवारी मध्यरात्री कलम १६८ अन्वये नोटिसा घरांवर चिटकविण्यात आल्या.

## कृषी विद्यापीठातील गौण खनिज उत्खनन वादाच्या भोवऱ्यात

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या तलावाचे खोलीकरण करण्याच्या नावाखाली गौण खनिजाचे उत्खनन सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. उत्खनन केलेले गौण खनिज रस्ते विकास महामंडळाने रस्त्यावर टाकण्यासाठी घेतल्याची माहिती मिळत आहे. मात्र, उत्खनन ठिकाणी महसूल विभागाचा कर्मचारी उपस्थित नसल्याने संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कृषी विद्यापीठाच्या तलावाचे खोलीकरण सुरू आहे. पाणीसाठा वाढविणे आणि गाळ काढणे हा या



कामाचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या कामातून मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तलावातून काढण्यात आलेले गौण खनिज रस्ते विकास महामंडळाने रस्त्यांच्या कामासाठी वापरण्यास घेतले आहे. त्यामुळे या उत्खनन प्रक्रियेबाबत कायदेशीर परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, तसेच महसूल विभागाकडून योग्य देखरेख ठेवली जात आहे का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी गौण खनिजाचे उत्खनन सुरू आहे, त्या ठिकाणी महसूल विभागाचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याचे दिसून येत आहे.

# स्त्री बीज बेकायदा विक्रीच्या रॅकेटचा पर्दाफाश !

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**बदलापूर :** गरजू महिलांना हेरून त्यांना पैशांचे आमिष दाखवत, त्यांच्या गर्भाशयात स्त्रीबीज वाढवण्याचे आणि त्यांची बेकायदा विक्री करण्याचे रॅकेट बदलापूरच्या जोवेली भागात उघडकीस आले आहे. हे रॅकेट चालवणाऱ्या तीन महिलांना बदलापूर पूर्व पोलिसांनी अटक केली आहे.

जोवेली भागात नॅनो सीटी येथील एका इमारतीत सुलक्षणा गाडेकर या महिलेच्या घरात हे रॅकेट सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर, बदलापूर पूर्व पोलिसांच्या पथकाने बुधवारी बदलापूर ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्स्ना सावंत यांच्या पथकासह छापा मारला. या घरात गर्भाशयात स्त्रीबीजांची वाढ करण्यासाठी लागणारी इंजेक्शन आढळून आली. गाडेकर ही गरजू महिलांना हेरून पैशांचे आमिष दाखवत असे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय त्यांना इंजेक्शन देत त्यांच्या गर्भाशयात स्त्रीबीजांची वाढ झाल्यानंतर त्या महिलांना आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवत असे. तेथील डॉक्टरांकडून गर्भाशयातील बीजांडे काढून त्यांची विक्री केली जात असे, असे पोलिसांनी सांगितले. आरोपी महिलेच्या मोबाइलमध्ये गर्भधारणेसाठी लागणारी इंजेक्शन, सोनोग्राफी, काही महिलांच्या खोट्या नावांची प्रतिज्ञापत्रे, इतर बनावट कागदपत्रे, तसेच काही महिलांची आणि आर्थिक व्यवहारासंबंधीची छायाचित्रे पोलिसांना आढळून आली आहेत.

# अखेर गावोगावीच्या ग्रामपंचायतींची प्रतीक्षा संपुष्टात

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कार्यकाळ जानेवारी ते डिसेंबर २०२६ या काळात संपणार असल्यामुळे या ग्रामपंचायतींवर प्रशासक राज येणार होते. त्यामुळे निवडणुकीसाठी उत्सुक आणि इच्छुक असलेल्यांची धाकधुक वाढली होती. आता जिल्ह्यातील २२३ ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम सुरू झाला असून, प्रभाग रचनेची प्रक्रिया घोषित झाल्याने गावोगावीच्या नागरिकांची प्रतीक्षा संपुष्ठात आली आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सन २०२२ च्या सुधारित तरतुदी, तसेच महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशांनुसार प्रभाग रचनेसाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. शासनाच्या ग्रामविकास विभागाने तसे निर्देश दिले आहेत. तहसीलदारांनी गुगल अर्थ नकाशावर आधारित गावनिहाय अद्ययावत नकाशे २० फेब्रुवारीपर्यंत तयार केले आहेत. त्यानंतर तलाठी व ग्रामसेवकांनी संयुक्त पाहणी करून २७ फेब्रुवारीपर्यंत प्रारूप प्रभाग रचना निश्चित करावी. तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून ५ मार्चपर्यंत तपासणी पूर्ण करून प्रस्ताव ११ मार्चपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे.

### ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना

पडताळणीनंतर १७ मार्चपर्यंत प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविला जाईल. आयोगाकडून २३ मार्चपर्यंत मान्यता अपेक्षित असून, ३० मार्चपर्यंत सुधारित प्रारूप रचनेस अंतिम स्वरूप देण्यात येईल. त्यानंतर ७ एप्रिलपर्यंत प्रारूप रचना प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्यात येतील. १३ एप्रिलपर्यंत हरकती स्वीकारल्या जातील, तर २१ एप्रिलपर्यंत सुनावण्या पूर्ण होतील. अंतिम प्रस्ताव २८ एप्रिलपर्यंत आयोगाकडे सादर करून ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना जाहीर केली जाणार आहे.

### संपूर्ण प्रक्रिया काटेकोरपणे पार पाडा!

प्रशासनाने सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे, तसेच नागरिकांनीही हरकती व सूचना निर्धारित कालावधीत नोंदवाव्यात. तसेच प्रभाग रचना करताना लोकसंख्या, भौगोलिक सलगता, प्रशासकीय सुसूत्रता आणि आरक्षणाचे निकष यांचा विचार करण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि नियोजित वेळेत राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

## मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प २५ फेब्रुवारीला!

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**मुंबई :** मुंबई महापालिका अर्थसंकल्प दरवर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सादर होतो. मात्र महापौर निवडणुकीसह, स्थायी समिती व अन्य समिती अध्यक्ष तसेच सदस्य निवडणूक प्रक्रियेमुळे अर्थसंकल्प लांबणीवर पडला होता. अखेर हा अर्थसंकल्प २५ फेब्रुवारीला सादर होणार आहे. नव्या स्थायी समिती अध्यक्षांसोबत महापालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. स्थायी समिती सभेत अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातही विविध प्रकल्पांसाठी भरीव तरतूद असण्याची शक्यता आहे. २०२५-२६मध्ये ७४ हजार ४२७कोटी ४१ लाख रुपयांचा अर्थसंकल्प मांडला होता.

# ३३ लहान मुलांवर अत्याचार; दाम्पत्याला मृत्युदंडाची शिक्षा!

वृत्तसंस्था २१ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** ३३ लहान मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याच्या प्रकरणात उत्तर प्रदेशातील एका न्यायालयाने एका जोडप्याला दोषी ठरवत मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. पीडितांपैकी काही मुलांचं वय जेमतेम तीन वर्ष होतं. उत्तर प्रदेशातील बांदा येथे पॉक्सो कायद्यांतर्गत विशेष न्यायाधीशांच्या न्यायालयाने हा ऐतिहासिक निकाल दिला.

आरोपी रामभवन आणि त्याची पत्नी दुर्गावती यांना लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्याच्या अनेक कलमांखाली दोषी ठरवण्यात आले. त्यामध्ये अनैसर्गिक संबंध, लैंगिक अत्याचार, लहान मुलांच्या अश्लील चित्रफिती बनवणे आणि गुन्हेगारी कट रचणे यांचा समावेश आहे. न्यायालयाने सरकारला प्रत्येक पीडित मुलाला १० लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. या व्यतिरिक्त आरोपींच्या घरातून जप्त केलेली रक्कम पीडितांमध्ये समान प्रमाणात वाटली पाहिजे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) ऑक्टोबर २०२० मध्ये रामभवन आणि इतरांविरुद्ध मुलांवरील लैंगिक शोषणाच्या आरोपावरून खटला दाखल केला होता. त्यानुसार आरोपींनी २०१० ते २०२० दरम्यान उत्तर प्रदेशातील बांदा आणि चित्रकूटमध्ये लैंगिक गुन्हे केल्याचे तपासादरम्यान सीबीआयला आढळून आले. गुन्हे क्रूर स्वरुपाचे होते; काही पीडितांच्या गुप्तांगांवर जखमा झाल्या होत्या, तर त्यापैकी काहींना वर्षानुवर्षे रुग्णालयात

# शासनाने एसटी कामगार संघटनांच्या आंदोलनाचा घेतला धसका !

## वेतन वाढीचे थकीत हप्ते देण्यास कटिबद्ध; आंदोलन मागे घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**मुंबई :** एसटीच्या सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीचे थकीत हप्ते देण्यासाठी शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली असून लवकरच फेब्रुवारी महिन्याच्या वेतनात सोबत देण्यात येणारा वेतन वाढीचा थकीत हप्ता कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसेच या अनुषंगाने येत्या २४ फेब्रुवारीला काही कामगार संघटनांनी पुकारलेल्या आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.



मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांना वेतन वाढीच्या थकीत हप्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे पैसे नसल्यामुळे शासनाने ती जबाबदारी उचलावी, अशी चर्चा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी केली होती. त्यानुसार त्यांच्या अनुमतीने दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये शासनाने अनुदान स्वरूपात एसटीला द्यावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामगार संघटनांच्या सोबत घेतलेल्या बैठकीमध्ये दिले होते. सदर थकीत हप्ते डिसेंबर महिन्याच्या वेतनात सोबत देण्यास सुरुवात झाली. तथापि काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत सदर हफ्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे निधी उपलब्ध नव्हता. त्यामुळे थकीत हप्ता न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याची भावना एसटी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण होऊन त्यांच्यात नाराजी पसरली. अशा परिस्थितीत काही कामगार संघटनांनी आंदोलनाच्या पवित्रा घेतला होता. सदर गंभीर परिस्थिती ओळखून परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन्ही उपमुख्यमंत्री व मुख्यमंत्री यांचीशी चर्चा करून या थकीत हप्त्यापोटी २१० कोटी रुपये तातडीने सरकारने एसटीला द्यावेत, अशी विनंती केली. त्याचा सातत्याने पाठपुरावा देखील केला. दरम्यान, या २१० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये आज शासनाने दिले असून उर्वरित निधीदेखील लवकरच प्राप्त होईल त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाचे हप्ते कोणत्याही परिस्थितीमध्ये देण्यात येतील, असे ठाम आश्वासन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शासनाच्या वतीने दिले आहे. तसेच सध्या दहावी व बारावीच्या मुलांच्या परीक्षा सुरू असल्यामुळे त्यांच्या प्रवासात कोणते अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी काही संघटनांनी पुकारलेले आंदोलन तातडीने स्थगित करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

# संपूर्ण कुटुंबाला महिनाभर धरले वेठीस; १.८३ कोटींनी फसवणूक

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**मुंबई :** तुमच्या नावावर गुन्हा दाखल आहे. सर्वोच्च न्यायालयाचे गुप्त आदेश आहेत. दर दोन तासांनी रिपोर्ट द्या, नाहीतर तत्काळ अटक करण्याच्या एका फोन कॉलने मुलुंडमधील ६२ वर्षीय निवृत्त बँक व्यवस्थापक आणि त्यांच्या कुटुंबाला वेठीस धरले. भामट्यांनी महिनाभर अख्ख्या कुटुंबाला 'डिजिटल अटकेत' ठेवत १ कोटी ८३ लाखांची लूट केली. याप्रकरणी पूर्व सायबर विभाग तपास करत आहे.

मुलुंड परिसरात पत्नी व मुलीसोबत राहणारे तक्रारदार २०२० मध्ये बँकेतून स्वेच्छानिवृत्त झाले. पत्नीही एलआयसीमधून निवृत्त तर मुलगी खासगी नोकरीत आहे. ७ जानेवारी दुपारी सुमारास तक्रारदार यांच्या मोबाईलवर एका महिलेचा फोन आला. मी टेलिकॉम विभागातून बोलतेय. तुमच्या नावावर दुसरे सीमकार्ड घेण्यात आले आहे, असे सांगत तिने कॉल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जोडला. स्वतःला टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी'चा अधिकारी महेश कुमार म्हणवणाऱ्या व्यक्तीने साळवींवर घाटकोपर पोलिसांत गुन्हा दाखल असल्याची भीती दाखवली.

### संपूर्ण कुटुंबच दहशतीत!

कुटुंबीयांना एका खोलीत बसवून दर दोन तासांनी रिपोर्ट देण्यास भाग पाडले गेले. 'कोणालाही सांगितले तर अटक आणि जीव धोक्यात येईल,' अशा धमक्यांनी कुटुंब भयभीत झाले. आरोपींनी त्यांच्या मालमत्तेची, बँक खात्यांची माहिती घेतली. १४ ते ३१ जानेवारीदरम्यान आरटीजीएसद्वारे विविध खात्यांत १.८३ कोटी वर्ग केले. अचानक ११ फेब्रुवारीनंतर संपर्क तुटला व सत्य उघड झाले. आरोपींच्या जाळयातून बाहेर येताच तक्रारदार यांनी १८ फेब्रुवारी रोजी १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाईनवर तक्रार नोंदविली.

# सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## भूमि अभिलेखचा तालुकास्तरावर जनता दरबार

**अमरावती :** जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातर्फे कामकाजाचा आढावा आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी तालुकास्तरावर जनता दरबार घेणार आहे. यासाठी चांदूरबाजार, अचलपूर आणि चिखलदरा येथील सुधारीत कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे.

यादरम्यान नागरिकांची जमिन मोजणी, नगर भूमापन, एकत्रिकरणाबाबत समस्या सोडविणार आहेत. तसेच या कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबंधित दिवशी उपस्थित राहतील. सुधारीत वेळापत्रकानुसार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १:३० यावेळेत चांदुर बाजार आणि दुपारी ३ ते ६ या वेळेत अचलपूर उपअधीक्षक कार्यालयात जनता दरबार होणार आहे. दि. ९ मार्च रोजी दुपारी १२ ते ३ वाजता चिखलदरा येथे जनता दरबार घेण्यात येणार आहे. तक्रारींच्या तात्काळ निवारणासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भूमी अभिलेखचे जिल्हा अधीक्षक महेंद्रकुमार शिंदे यांनी केले आहे.

## थिलोरी येथे शिवमुद्रा सार्वजनिक शिव मंडळाच्या वतीने शिवजयंती महोत्सव साजरा

### ♦जयंती महोत्सवाला गावातील सर्व जाती धर्मातील बांधव एकत्र

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**दर्यापूर :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा दर्यापूर तालुक्यातील थिलोरी येथे शिव मुद्रा सार्वजनिक शिव मंडळाच्या वतीने शिवजयंती महोत्सव अतिशय उत्साहात पार पडला. गेल्या पाच वर्षांपासून हा शिवजयंती महोत्सव सामाजिक कार्यकर्ते विकी पाटील होले यांच्या नेतृत्वात सुरू आहे .

या महोत्सवात गावातील सर्व जाती धर्मातील तरुण युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.



यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनानिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीमध्ये विशेष आकर्षण होते म्हणजे चिमुकल्या मुलींनी लेझीम नृत्य . लेझीम नृत्य सादर करून चिमुकल्या मुलींनी गावकऱ्यांचे मन जिंकले .

त्यानंतर अतिशय शांततेच्या मार्गाने संपूर्ण गावातून वाजत गाजत छत्रपती शिवाजी महाराजांची भावी मिरवणूक पार पडली . कायदा व सुव्यवस्था सुरळीत रहावा यासाठी पोलिसांचा बंदोबस्त सुद्धा तैनात करण्यात आलेला होता. मिरवणुकी दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर , राजमाता अहिल्यादेवी होळकर, यांच्या पुतळ्याला हारअर्पण आयोजकांच्या वतीने करण्यात आले. मिरवणुकीत गावातील ज्येष्ठ नागरिकांनी सुद्धा सहभाग लाभलेला होता.

## पुढील चार दिवस विदर्भात किमान तापमान

### हवामान तज्ञ अनिल बंड यांचा अंदाज

**अमरावती :** पुढील तीन-चार दिवसात विदर्भात किमान तापमानात किंचित बदल होईल. तसेच कमाल तापमान सुद्धा १-२ डिग्री ने वाढण्याची शक्यता आहे. हवामान तज्ञ अनिल बंड यांनी व्यक्त केला आहे. आग्नेय बंगालच्या उपसागरात ५.८किमी उंची वर चक्राकार वारे वाहत आहेत तसेच याच्या प्रभावामुळे २२-२३ तारखेला त्याच भागात एक कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होईल. सदर हवामान शास्त्रिय परिस्थिती मुळे २३-२४ तारखेला विदर्भात तुरळक ठिकाणी ढगाळ वातावरण निर्माण होऊन तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. अमरावती तापमान ३५; १७.५ष्टण् २७ फेब्रुवारी नंतर पुन्हा ढगाळ वातावरण निर्माण होऊ शकते असेही प्रा.अनिल म बंड श्री शिवाजी हवामान केंद्र श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती यांनी व्यक्त केला.

## होळीनिमित्त मनरेगा मजुरांसाठी तातडीने रु. ६७ कोटी निधी मंजूर

### ♦ रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अमरावती:** होळीनिमित्त आदिवासी बांधवांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना तातडीने मजुरी अदा करण्यासाठी ६७ कोटींचा निधी मंजूर केला आहे. सदर निधीची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली असून पुढील दोन ते तीन दिवसांत मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी माहिती रोजगार हमी योजना विभागाचे मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट, पालघर तसेच इतर आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्र शासनाने राज्याच्या १३ कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटमध्ये वाढ करून सुधारित १६ कोटी मनुष्यदिवसांच्या बजेटला मान्यता दिली आहे. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होऊन मजुरी वेळेत अदा केली जाईल, असेही मंत्री गोगावले स्पष्ट केले.

## बापू कॉलनीवासियांनी केला नवनिर्वाचित महापौर, नगरसेवक व गुणवान खेळाडूंचा सत्कार



प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अमरावती :** श्री. गजानन महाराज मंदिर , बापू कॉलोनी अमरावती येथे नुकताच प्रगटदिन सोहळ्यात अमरावतीचे प्रथम नागरिक महापौर श्री. श्रीचंद तेजवानी, नगरसेवक . प्रशांत भाऊ वानखडे, महेश भाऊ मूलचंदानी, नगरसेविका . पद्मजाताई कौडन्य, नंदाताई सावदे, शारदा मंगेश खोंडे ह्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

अनंत उर्फ पिंटूभाऊ देशमुख, प्रशांत वाकोडे, रवींद्र बाखडे व किरण गुल्हाने ह्यांनी कॉलोनी वासियांतर्फे शाल , स्मृतिचिन्ह, नारळ व दुपट्टा देऊन सन्माननीय लोकप्रतिनिधींचा सत्कार केला .

याप्रसंगी सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे श्री गजानन महाराज मंदिर च्या वतीने कॉलनीतील व परिसरातील ज्या युवा खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाच्या माध्यमातून परिसराचे , अमरावतीचे ,महाराष्ट्राचे नाव सर्वदूर पसरविले त्या गुणवान खेळाडूंचा सत्कार समारंभ माननीय महापौर, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अविनाश पुंड , व नवनिर्वाचित नगरसेवकांच्या हस्ते महाराजांची आशीर्वादरुपी शाल , स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ देण्यात येऊन करण्यात आला . यामध्ये

हर्षी उर्फ छुनछुन भूषण गुप्ता वय वर्ष १२ ( बुद्धिबळ ), स्वर्णिम मिलिंद चेपे वय वर्ष १७ ( वॉटर पोलो ) , देवरत संतोष खांडेकर वय वर्ष १६( बॅडमिंटन ) तसेच अमरावतीचे सुपुत्र पोलिस विभागात कार्यरत असलेले श्री. अनंतराव व्यवहारे ह्यांना राष्ट्रपती पदक अवॉर्ड प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

बापू कॉलनी रहिवाशी कुमारी हर्षी भूषण गुप्ता हिने बुद्धिबळ स्पर्धेत आतापर्यंत अनेक स्पर्धा जिंकत असंख्य पदकांची लूट केलेली आहे . १२ वर्षाच्या हर्षी भूषण गुप्ता हिचे आंतरराष्ट्रीय रँकिंग १५२३ असून हि एक उल्लेखनीय उपलब्धी आहे आतापर्यंत तिने अनेक स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेले असून दिग्गज खेळाडूंना पराभवाची धूळ चारत साधारणता ४५ पदकांची कमाई केली आहे .

१७ वर्षीय स्वर्णिम मिलिंद चेपे ह्याने वॉटरपोलो स्पर्धेत राज्यस्तरीय व देशपातळी वरील स्पर्धेत चमकदार कामगिरी करत स्विमिंग व वॉटरपोलो स्पर्धेत महाराष्ट्राचे नाव उज्वल केलेले आहे. पुणे येथे झालेल्या मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत त्याने ब्राँझ मेडल ची कमाई केलेली आहे . स्वर्णिम मिलिंद चेपे ह्याने आतापर्यंत ४ गोल्ड , ४ सिल्वर, व २ ब्राँझ मेडल ची कमाई राष्ट्रीय स्पर्धेत केलेली आहे .

**देवरत संतोष खांडेकर**

ह्याने जिल्हास्तरीय, विभागीय, राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला असून, जिल्हास्तरीय व विभागीय स्तरावर विविध ठिकाणी विजेता व उपविजेता म्हणून आपल्या यशाची ठळक नोंद केली आहे.

## भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखेची उद्या महत्त्वपूर्ण सभा

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अमरावती:** अमरावती महानगर पुरुष व महिला शाखांच्या संयुक्त विद्यमाने प्रमुख तालुका पदाधिकाऱ्यांची अत्यंत महत्त्वपूर्ण सभा रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही सभा महाबोधी बुद्ध विहार, सबनीस प्लॉट चौक, अमरावती येथे होणार आहे.

या सभेला अमरावती पूर्व, अमरावती पश्चिम तसेच अमरावती महानगर महिला व पुरुष शाखेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच दोन्ही जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यातून फक्त अध्यक्ष व सरचिटणीस यांनीच उपस्थित राहावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

ँ.ए.घ्. मिशन २५ च्या अंमलबजावणीसाठी १४ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या कार्यशाळेच्या तयारीबाबत नियोजन., १५ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या सभासद नोंदणी अभियानाचा आढावा.. बौद्धाचार्य, श्रामणेर शिबिरे तसेच समता सैनिक दल शिबिरांचे आयोजन. जिल्हास्तरीय बुद्ध गया पर्यटन व महाराष्ट्र पर्यटन सहलींचे नियोजन. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रकाश बोरकर (जिल्हा अध्यक्ष, अमरावती पूर्व) राहणार आहेत. मार्गदर्शनासाठी मा. विजयकुमार कि. चौरपगार (राज्य संघटक) तसेच प्रा. डॉ. मुकेश सरदार (जिल्हा अध्यक्ष, अमरावती पश्चिम) उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मायाताई धांडे (जिल्हा अध्यक्षा, महिला शाखा अमरावती पूर्व), संगीताताई सरदार (जिल्हा अध्यक्षा, महिला शाखा अमरावती पश्चिम), प्रमिला ताई शेंडे (अमरावती महानगर अध्यक्षा) आणि गौतमराव गजभिये (अमरावती महानगर अध्यक्ष) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन



**अमरावती:** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी निवडणूक शिवाजी शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, अल्पेश हाते आदी उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.


## नगर परिषद कार्यालय, घाटंजी जि. यवतमाळ

### गाळे विभाग

### ई-लिलाव सूचना

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, नगर परिषद घाटंजी हद्दीतील स.नं. १ अ.क्र.९ (आठवडी बाजार परिसर) येथील १३ व्या वित्त आयोग अंतर्गत बांधलेले छत्रपती शिवाजी महाराज व्यापार संकुल G ब्लॉक मधील एकूण २२ दुकान गाळ्याचे ०३ वर्षाच्या कालावधीत करिता (प्रतिवर्ष 10% दर वाढ गृहीत धरून) व तदनंतर दर ०३ वर्षांनी पुढील ०६ वर्षाकरिता भाडे तत्वावर नुतनीकरण केले जाईल व ०९ वर्षानंतर सर्व गाळ्याचे फेरलिलाव करण्यात येईल.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ९२(३), महाराष्ट्र नगर परिषद (स्थावर मालमत्ता हस्तांतरण) नियम १९८३, स्थायी निर्देश क्र. २४ व शासन निर्णय यामधील अटी व शर्ती यास अधीन राहून सदर ई-लिलाव सूचना प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर ई-लिलाव बाबत सविस्तर माहिती **www.eauction.gov.in** या संकेतस्थळावर व कर विभाग नगर परिषद कार्यालय घाटंजी येथे दि.२१/०२/२०२६ ते ०९/०३/२०२६ पर्यंत पाहावयास उपलब्ध आहेत व ई-लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई-लिलाव बोली बोलणेचा कालावधी दि.१३/०३/२०२६ सकाळी ११:०० ते ३:०० वाजेपर्यंत राहील.

(टीप : सदर ई-लिलाव प्रक्रियेबाबत लिलाव धारकास शंका/अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत कर विभाग न.प. घाटंजी येथे संपर्क साधावा.)

-स्वा-
(परेश कारिया)
नगराध्यक्ष, न.प. घाटंजी

-स्वा-
(राजू घोडके)
मुख्याधिकारी, न.प. घाटंजी


## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय येथे व्हीएलएसआय चिप डिझाइन कार्यशाळा संपन्न

**अमरावती:** तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची व्याप्ती वाढत असताना, या क्षेत्रातील तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभाग आणि पुणे येथील 'एजूस्फियर सिस्टिम्स' यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली 'इलेक्ट्रॉनिक डिसाईन ऑटोमेशन टूल्सचा वापर करून सेमीकंडक्टर संकल्पना ते फ्रंट-एंड आणि बॅक-एंड इंडस्ट्री रेडी व्हिएलयसआय चिप डिझाइन' ही तीन दिवसीय कार्यशाळा येथे नुकतीच संपन्न झाली. प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना चिप डिझाइनमधील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि उद्योगक्षेत्रातील गरजांशी अवगत करणे हा होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने भारत सरकार देशात सेमीकंडक्टर क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्नशील आहे. या पार्श्वभूमीवर, भविष्यातील अभियंत्यांना या क्षेत्रातील मूलभूत संकल्पना, ऑपरेटिंग तत्त्वे आणि हार्डवेअर प्रोग्रामिंगचे सखोल ज्ञान मिळावे यासाठी हे हँड्स-ऑन प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरले. या तीन दिवसांच्या कालावधीत सुमारे १२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना मायक्रोविंड , डिव्हाईस स्केमॅटिक, स्पाइस आणि व्हिवाल्डो यांसारख्या अद्ययावत सॉफ्टवेअर्सचा वापर करून चिप डिझाइन आणि प्रोग्रामिंगचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.


GOVERNMENT OF MAHARASHTRA
AMRAVATI ELECTRICAL DIVISION,
PUBLIC WORKS DEPARTMENT, AMRAVATI.
E-TENDER NOTICE NO. 100 FOR 2025-2026

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Amravati (Electrical) Division, Public Works Division, Amravati on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under E-Tender procedure.

| Sr. No. | Name of work | Amount Put to Tender | E.M.D. |
|---|---|---|---|
| 1 | Estimate No 904/EE/AKL/2014-25 Providing Supplying Installing, Testing, Commissioning of IOT- Based Smart Optimizer at Government Medical College, at AKOLA, Dist. Akola. | 57797995/- | 288990/- |

Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be downloaded from the eTendering portal of Public Works Department, Governmen of Maharasatra i.e. https/mahatenders.gov.in in after entering the details, payment of Rs. 3540/- (including GST) (Rupees Three Thousand Five Hundred Forty Only) (Including GST) should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable. Further information regarding the work can be obtained from the above office.

: TENDER SCHEDULE :

| | | |
|---|---|---|
| Cost of Tender From | : | Rs. 3,540/- (Including GST) |
| Period of download of bidding document | : | From 20.02.2026 Time 10.00 Hours To 27.02.2026 Time 18.55 Hours |
| Pre bid conference date, time and venue | : | on 23.02.2026 @ 12.00 Hours in the office of Chief Engineer, P.W.D. Campus, Camp Road, Amravati-444601, Queries shall be sent to E.E. via. Email at least a day before (elamaravati.ee@mahapwd.gov.in) |
| Receipt of online EMD, Tender Document fee to be paid online only via payment Gateway mode Only. | : | Document Tender Fee and EMD to be paid via online mode only, Through bidders own account. |
| Place time and date of opening technical bids | : | Office of the Superintending Engineer, Nagpur Region (Electrical) Circle, PWD Nagpur, Date 02.03.2026 Time 11.00 to 18.55 Hours |
| Place Time and date of opening financial bids | : | Office of the Superintending Engineer, Nagpur Region (Electrical) Circle, PWD Nagpur, Date 02.03.2026 Time 11.00 to 18.55 Hours |
| Performance Security Deposit | : | If the Lowest Tender has quoted below the Scheduled cost by more than 1% he should submit Performance Security Deposit in the form of Bank Guarantee/ Demand Draft/F.D.R. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Amravati within 8 days from the opening of envelop No.2 as per Govt. Circular No. CAT/2017/C.No. 08/Bid-2, Dt. 26/11/2018 |
| Regitrationclass of Contractor | : | Bidder having Valid License of Electrical Contrator issued by chief Electrical Inspector, Industries, Energy & Labour Department, Govenment of Maharastra |

Lr.No.Ex.En./(Ele.)/Amt./T.C./ 461/ 2026
Office of the Executive Engineer(Electrical) Divison
Amravati P.W.(Electrical) Division, P.W.D. Compount Camp, Amravati
Email : elamravait.ee@mahapwd.com Date : 18/02/2026

**Executive Engineer**
Amravati Electrical Division
Public Worsk Division
Amravati.


### सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

## भरधाव बोलेरोची दुचाकीस जबर धडक दुचाकीस्वार गंभीर जखमी

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**खामगाव :** बुलढाणा रोड वरील ग्राम दाताळा नजीक वृद्धाश्रमा जवळ भरधाव बोलेरो गाडीने दुचाकीस जबर धडक दिल्याची घटना सायंकाळी पाच वाजे दरम्यान घडली. या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याला प्राथमिक उपचारार्थ मलकापुर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की ग्राम शेलापूर येथील सुरेश भोपळे ४५ हे मलकापूर वरून बजाज डिस्कवर मोटरसायकल क्रमांक एम एच २८ डब्ल्यू ३४६१ ने शेलापुर येथे आपल्या घराकडे जात असताना मलकापूर कडे येणाऱ्या भरधाव बोलेरो गाडी क्रमांक एम एच २८ एच ९०७६ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दाताळा येथील हरी चैतन्य महाराज वृद्धाश्रमा जवळ जबर धडक दिली. या धडकेत दुचाकी स्वार सुरेश भोपळे यांच्या डोक्याला व पायाला गंभीर मार लागला असून त्यांना प्राथमिक उपचारार्थ दाताळा येथील पत्रकार विलास खर्चे, सुहास नारखेडे, राहुल पाटील, सोहम पाटील सह आदींनी रुग्णालयात दाखल केले. अपघाताची माहिती मिळता बरोबर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, अ‍ॅड. हरीश रावळ यांनी रुग्णालयात धाव घेत त जखमीची विचारपूस केली, सुरेश भोपळे यांच्या डोक्याला गंभीर मार लागला असल्याने त्यांना पुढील उपचारार्थ जळगाव (खां) येथे हलविण्यात आले आहे.

## मुरुमाची अवैध वाहतूक; दोघांविरोधात गुन्हा दाखल; ट्रॅक्टर-ट्रॉलीतून दोन ब्रास मुरूम जप्त; आरोपी फरार

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**खामगाव :** कुंबेफळ गावालगत मुरूमाची अवैध वाहतूक करताना दोघांवर कारवाई करण्यात आली असून, पिंपळगाव राजा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

चंद्रकांत प्रल्हाद पिसे (३७, ग्राम महसूल अधिकारी, पिंपळगाव राजा भाग-१, तहसील कार्यालय खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता कुंबेफळ गावाजवळ विना क्रमांकाच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीद्वारे मुरूमाची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. तपासणीदरम्यान सौरभ मुरलीधर खंडारे (३५) व डिगंबर महादेव चोपडे (३२) दोघेही रा. निपाणा हे दोन ब्रास मुरूम (अंदाजे किंमत ६,००० रुपये) वाहतूक करताना आढळले. कारवाईची चाहूल लागताच आरोपींनी कुंबेफळ फाट्याजवळ मुरूम टाकून पळ काढला. मुरुमाचा साठा जप्त करण्यात आला असून, आरोपींचा शोध सुरू आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), २२१, ३(५) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील (मोवाका) कलम ३९/१९२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार खांदे करीत आहेत.

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## हातरुण ग्रामपंचायतीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**हातरूण:** ग्रामपंचायत मध्ये छत्रपत शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुण अभिवादन करण्यात आले. सरपंच उजेफा परवीन सैय्यद कासीम, ग्राम विकास अधिकारी योगेश तोताराम

कापकर सर्व ग्राम पंचायत सदस्य व कर्मचारी व गावकरी ग्रामस्त उपस्थित होते.

## केशव दिव्यांग महिला बहुउद्देशीय संस्थेने जल्लोषात साजरी केली शिवजयंता



**अकोला:** दिव्यांग वर्गाच्या विकासात्मक सेवा कार्यासाठी सेवारत केशव दिव्यांग महिला बहुउद्देशीय संस्थेने छत्रपती शिवाजी महाराज यांची पावन जयंती विविध कार्यमाच्या अनुषंगाने साजरी केली.केशव दिव्यांग महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष, ज्येष्ठ गायिका मनिषाताई खेडकर यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रहार अपंग क्रांती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष मोईन अली, प्रकाश गटलवार, उबेद खान दिव्यांग सुषमा मोकाशी आजी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांनी हिंदवी स्वराज्याचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यानंतर माता जिजाऊ गाडगेबाबा आदींना पुष्पहार अर्पण केला या कार्यक्रमात परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बालपणावर आधारित लघु नाटिका सादर करण्यात आली बाल शिवाजीच्या भूमिकेत खुशबू जैन हिने तर जिजाऊ च्या रुपात छकुली छबिले तिने भूमिका सादर केले.

## एस. टी. तर्फे शिकाऊ उमेदवारी भरती

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला:** एस. टी. महामंडळाच्या एक वर्ष मुदतीसाठी शिकाऊ उमेदवार पदाच्या भरतीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. भरतीत यांत्रिक (मोटारगाडी), शीट मेटल (एमव्हीबीबी), डिझेल मेकॅनिक, ऑटो इलेक्ट्रिशियन, इलेक्ट्रिशिअन, वेल्डर, रेफ्रिजेशन व एअर कंडिशन, पेंटर आदी ८३ पदे समाविष्ट आहेत.

त्यासाठी आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांनी 'अ‍ॅप्रेंटिसशीप इंडिया' या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत. त्यात एमएसआरटीसी अकोला ही आस्थापना निवडावी. ऑनलाईन अर्ज केल्यावर विहीत नमुन्यातील अर्ज दि. २० फेब्रुवारीपर्यंत सकाळी ११ ते ३ या वेळेत विभागीय कार्यालय, मंगरूळपीर रोड, अकोला येथे स्वीकारले जातील.

# गणेश जयरामनाथ महादेव संस्थानमध्ये टाळ मृदंगात शिव नामाचा गजर

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोट:** *वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञावासी । ऐसा वर या टौकेसी ।।*

श्री गणेश जय रामनाथ महादेव संस्थान मध्ये सालाबाद प्रमाणे महाशिवरात्री निमित्याने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजन व महाशिवरात्री निमित्त संपूर्ण गावांमधून टाळ मृदुंग नामाच्या गजरात महिला व पुरुष श्री संत चतुर्भुज महाराज महिला भजनी मंडळाच्या पुढाकारात समाधी स्थळ श्री गणेश जयराम महादेव संस्थान मधून सजवलेल्या शोभा रथावर महा विक्राळ शिवलिंग भोलेनाथ मूर्त ,श्रीराम प्रभू सीता माई व महा विराट हनुमंत राया च चतुर्भुज महाराज यांच्या फोटो प्रतिमा व भोलेनाथ महाराजांचा फोटो पालखीमध्ये महाराजांच्या पादुका विराजमान करून संपूर्ण गावांमधून शोभायात्रा काढण्यात आली व शोभा यात्रेमध्ये विशेष टाळकर्त्यांचे पोशाख व फेटे हे आकर्षण ठरले होते यामध्ये विविध प्रकारचे नृत्य कीर्तनावर फुगड्या अभंग





अशा विविध कलाकृतींनी पाहणाऱ्यांचे डोळ्याचे पारणे फेडणारे असे अवलौकिक नृत्य देखावा करण्यात आला, मंदिरामध्ये शिवलिंग महादेवाच्या समोर याच ठिकाणी श्री संत चतुर्भुज महाराज यांचे वास्तव असलेले ध्यान समाधी अस्तित्व आजही आहे इथेच त्यांचे संपूर्ण जीवन गेले यास मंदिरात आजही भाविक त्यांची श्रद्धा मोठ्या भावनिकतेने जपत आहेत ज्ञानेश्वरी पारायण प्रारंभ सोमवार गोपाल काला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला १२ ते. ४. ज्ञानेश्वरी पारायण, ४.३० ते ५.३०. प्रवचन भागवत गीता, महाभारत रामायण देवी भागवत शिवपुराण या विषयावर करण्यात आले, संध्याकाळी हरिपाठ ७.३० ते ९ वाजता महिला व पुरुष भजन मंडळ दररोज करण्यात आले, दि.१५. शिवरात्री निमित्त शिव पुराण महात्म्य व नंतर फराळ श्री जय रामनाथ संस्थान तर्फे करण्यात आले तसेच सायंकाळी दिप महोत्सव, ग्रंथ पूजन व शिवनगर प्रदक्षिणा काढण्यात आली, यावेळी चक्रार व्यासपीठ नेतृत्व हभप बापूराव काळे, हभप रमेश पळसकर, हभप जगन्नाथ हाडोळे , हभप कृष्णा मुळे ,हभप अच्युत बोरोळे, यांनी केले यावेळी कार्यक्रमाचे मुख्य यजमान गजानन हाडोळे, देवेंद्र खलोकार, विनोद गणगणे, अनिल गोरडे, ज्ञानेश्वर लांडे, दीपक गणगणे, संदीप शेगोकार, हिम्मत मुळे, मनोहर लहाने, विलास वि. खलोकार, पंजाब बोरोळे, बंडूभाऊ शेगोकार, अरुण येवतकार, यांच्या प्रमुख उपस्थित मुख्य यजमानाचा कार्यक्रम पार पडला यावेळी या श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला शिवरात्रीच्या महाउत्सवाला सर्व गावातील भाविक महिलांचा प्रचंड प्रमाणात उस्फुर्तेने सहभाग नोंदविला या पारायण सोहळ्याला गायक वादक व भजनी मंडळी मोठ्या प्रमाणात संत महाराज लोकांचा हरहुन्नरीने उपस्थिती लावली , सोमवार दि. १६ ला सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन झाले,सर्व ज्ञानेश्वरी पारायण कर्त्या महिलांना ज्ञानेश्वरी ग्रंथ सप्रेम भेट व श्रोत्या महिलांना श्रीमद भागवत गीता देण्यात आल्या महाप्रसादाचे आयोजन श्री गणेश जय रामनाथ महादेव संस्थान यांच्यातर्फे करण्यात आले यावेळी गजानन सावरकर, शुभम बोडखे इंजि, विपिन डांगरे इंजि. विनय सुपासे, रामदास हुसे, सुधीर गणगणे, हभप जगन्नाथ हाडोळे, विजय गणगणे, निशांत गणगणे, आशिष पाठक , बंडूभाऊ बोडखे, यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला संस्थान अध्यक्ष डॉ.अनिल गणगणे यांचे कार्यक्रमाला विशेष सहकार्य लाभले यावेळी शोभायात्रा मंदिरात येऊन आरती करून सर्व भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले व कार्यक्रमाचा समारोप करून सर्वांचे संस्थांकडून आभार मानण्यात आले दिंडी चालकांना श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

## शिवजयंती सोहळ्यात मराठा सेवा मंडळ महिला आघाडीचा सहभाग

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** मराठा सेवा मंडळ अकोला महिला आघाडी तर्फे शिवाजी पार्क येथे शिवजंयती दिनी छत्रपती शिवाजी महाराजांना मराठमोळ्या पध्दतीने कुणी शिवबा घ्या, कोणी शिवबा घ्या सुर व तालात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा गाऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

मराठा समाजातील महिलांनी कार्यक्रमाला शिवनेरी सारखी शोभा आणली. एका सूरतालात शिवाजी पार्कचे वातावरण ढवळून निघाले. छत्रपतींचा जन्म झाल्यानंतर सर्वांनी ऐकमेकांना अलिंगन दिले. जिजाऊच्या पोटी छत्रपती जन्मास आला. प्रत्येक मुलाला शिवचरित्र



सांगून त्यांच्यामध्ये छत्रपतीचे चरित्र, वीरता व प्रत्येक महिलासाठी आई मातेची भुमिका व शिवाजी महाराजांचे रयतीवर असलेले प्रेम त्यांच्या अंगीकृत आणू शकते असे रोहिणीताई पाटोळे व शोभा वाकोडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता महिला भगिनीमध्ये सौ. शोभा चौधरी, सिंधु पवार, शारदा सटाले, आशाताई थिटे, शोभाताई गरड, शुभांगी बरडे, मंदा चव्हाण, अर्चना पावले, मीना देशमुख, मंजुषा मांडवे, दुर्गा ददगाळ, सविता गवळी, कल्पना गुंजाळ, जयश्री तोरडमल, गीता भागडे, रोहिणी पाटोळे, सविता पवार, नंदा गुंजाळ, सुरेखा बुंदेले, अलका पाटील, स्वाती मांडेकर, सविता जाधव, सुनिता दळवी, सुनंदा थिटे, शितल चव्हाण, राखी महल्ले, सुनिता लोहकरे, रूपाली मोरे, वंदना पठाडे, जया शिंदे, लक्ष्मी केंदळे, रूपाली कावळे, अनिता थिटे, मंजुळा कावळे, सुनिता कावळे, गुड्डी सोनोने, संगिता कावळे, आशा थिटे, अर्चना चव्हाण, शालिनी शिंदे, माया मांडवे, संगिता पवार, संध्या काकडे, लिलाबाई काकडे, नंदा पवार, छाया भागडे, कल्पना सोनोने, मंजुषा बरडे, कमल देव, राजश्री तावरे, संगिता कानगुडे, वेणुताई सनगाडे, नंदाताई पुनसे, प्रतिभा जगताप व असंख्य महिला उपस्थित होत्या. मराठा सेवा मंडळ अध्यक्ष मुरलीधर सटाले, नगरसेवक पवन महल्ले, पंडीत चौधरी, गणेश गिराम, कैलास गाढवे, प्रदीप लुगडे, गजानन थिटे, मारोतराव भगत, उत्तमराव वाळसकर आदींची उपस्थिती होती.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रम

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**मुर्तीजापुर:** स्टेशन परिसरातील तेज हनुमान मित्र मंडळ व रोहित अव्वलवार मित्रपरिवारच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त रक्तदान शिबिर, नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर प्रकाश टाकला.



कार्यक्रमाला नगराध्यक्ष हर्षल साबळे नगरपरिषद उपाध्यक्ष रोहित अवलवार नगरसेवक गजानन नाकट, आरोग्य सभापती पुनम माडकर, नगरसेविका शुभांगी सरनाईक, नगरसेवक संदीप सरनाईक नगरसेवक पंकज कांबळे नगरसेवक राम जोशी नगरसेविका प्रज्ञा निलेश वानखडे नगरसेवक राहुल गुल्हाने राम खंडारे राहुल पाटील रितेश सबाजकर , कोमल तायडे संदीप जळमकर रवी माडकर पप्पू मुळे नगरसेवक लखन मिलादे निलेश वानखडे, प्रकाश अवलवार, मधुअण्णा अवलवार, वसंतां अण्णा गायकवाड, गणेश अवलवार, बक्कु अण्णा गुंजाळ. सतनाम सिंग,.सुभाष अवलवार , राजु गोयल सुभाष येरडावकर इतर समाज बांधव तसेच रोहित अवलवार मित्रपरिवार मित्र मंडळाचे सदस्य गण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पत्रकार अन्वर खान यांनी केले.

## नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय, मामा-मामींविरुद्धची कार्यवाही रद्द

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**मुर्तिजापूर:** नुकताच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कलम ४९८-अ अन्वये दाखल गुन्ह्यात पतीच्या नातेवाईकांविरुद्ध करण्यात आलेली फौजदारी कारवाई रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे.

मूर्तिजापूरला नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यात पतीचे मामा नंदकुमार नामदेवराव वानखडे व मामी सौ. निर्मला नंदकुमार वानखडे यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली होती. या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयात अ‍ॅड. सचिन वानखडे यांच्यामार्फत याचिका दाखल करून एफआयआर व त्यानंतरची कार्यवाही रद्द करण्याची मागणी केली होती.

फिर्यादीने आपल्या तक्रारीत विवाहानंतर पतीकडून छळ व मारहाण झाल्याचे नमूद केले होते. तसेच संबंधित अर्जदारांनी पतीपासून घटस्फोट घेण्यासाठी प्रवृत्त केल्याचा व इतर संयुक्त आरोप केल्याचेही नमूद करण्यात आले होते. मात्र, आरोपींच्या वकिलांनी अर्जदारांविरुद्ध कोणतेही ठोस, विशिष्ट किंवा प्रत्यक्ष कृत्य तक्रारीत नमूद नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, केवळ नातेवाईकांची नावे तक्रारीत नमूद करून त्यांना कोणतीही ठोस भूमिका किंवा विशिष्ट कृत्य न दर्शविता ४९८-अ अंतर्गत गुन्हा दाखल करणे ग्राह्य धरता येणार नाही. अर्जदारांविरुद्ध प्रथमदर्शनी गुन्हा सिद्ध होईल असे काहीही अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

त्यामुळे उच्च न्यायालयाने संबंधित अर्ज मंजूर करत गुन्हा क्र. १८९/२०२३ व त्यातून उद्भवलेली आर.सी.सी. क्र. ११२/२०२४ ही कार्यवाही अर्जदारांच्या मर्यादेत रद्द व बाद करण्याचा आदेश दिला. आरोपींतर्फे न्यायालयात अ‍ॅड. सचिन वानखडे यांनी युक्तिवाद केला.

## डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन मध्ये शिवजयंती साजरी

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अडगाव:** डॉ. जगन्नाथ ढोणे विद्या निकेतन मध्ये शिवजयंती साजरी केली. सुरुवातीला प्रतिमेचे पूजन व शिवाजी महाराजांची आरती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका ढोकणे मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापिका मोदे मॅडम , लिपिक वानखडे तसेच शिक्षक खिरोडकार मॅडम ,प्राजक्ता वानखडे ,प्रांजली वानखडे , प्रगती राखोंडे मॅडम, दिपाली ताठे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालक सौ किरण ताठे मॅडम यांनी केले. तसेच झुलवा पाळणा या नृत्यावर ईश्वरी रेळे व ओवी निमकर्डे या चौथीच्या विद्यार्थिनींनी बहारदार असे नृत्य



सादरीकरण केले तसेच इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी श्रीमई गीऱ्हे हिने एकच राजा येथे जन्मला या बहारदार गीतावर आपले नृत्य सादर केले. तसेच बऱ्याच विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांची वेशभूषा धारण केली आणि अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी आपले विचार व्यक्त केले. शिवजयंती उत्सवानिमित्त शाळेत चित्रकला स्पर्धा तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वानखडे सर यांनी केले.

## प्रेमसंबंध, धमक्या आणि अखेर बलात्काराचा गुन्हा; न्यायालयाकडून आरोपीला अटींसह जामीन

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**मुर्तीजापुर :** मुर्तिजापूर तालुक्यातील सात वर्षे चाललेल्या कथित प्रेमसंबंधांना अखेर कायदेशीर वळण मिळाले असून, या प्रकरणातील आरोपीला अकोला येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने अटींसह जामीन मंजूर केला आहे.

**ओळखीपासून आरोपांपर्यंत...**

फिर्यादी आणि आरोपी या दोघांची ओळख २०१८ मध्ये झाली. तक्रारीनुसार आरोपीने लग्नाचे आश्वासन देत २०१९ पासून तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. पुढे हे संबंध अनेक वर्षे सुरू राहिले.

मात्र, २०२३ आणि जानेवारी २०२६ मध्ये शेगाव येथे धमक्या देत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे. आरोपीने फिर्यादीला आत्महत्येची धमकी तसेच फोटो व्हायरल करण्याची भीती दाखवून तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला असा दावा देखील करण्यात आला आहे. २ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला आणि ४ फेब्रुवारीला आरोपीला अटक करण्यात आली.

**बचाव पक्षाचा युक्तिवाद**

अ‍ॅड. सचिन चंद्रमणी वानखडे यांनी बचाव पक्षाच्या बाजूने युक्तिवाद करून न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की फिर्यादी ही प्रौढ, सुजाण व विवेकी महिला आहे. सुमारे सात वर्षे संबंध सुरू असताना कोणतीही तक्रार दाखल करण्यात आली नव्हती, ही बाबही विशेष लक्षवेधी असल्याचे त्यांनी मांडले.

तपास यंत्रणेकडून आरोपीची कोठडी घेण्यात आली असून आवश्यक ती चौकशी पूर्ण झाली आहे. आरोपी स्थानिक रहिवासी असून फरार होण्याची शक्यता नाही, तसेच तो न्यायालयाने घालून दिलेल्या कोणत्याही अटी पाळण्यास तयार आहे, असेही स्पष्ट करण्यात आले.

बचाव पक्षाने असेही अधोरेखित केले की, संबंध दीर्घकाळ टिकलेले असल्यामुळे प्रकरणाचा संपूर्ण संदर्भ आणि परिस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे. केवळ आरोपांच्या आधारे आरोपीला अनावश्यक काळ कोठडीत ठेवणे योग्य ठरणार नाही, असा युक्तिवाद करण्यात आला.

**सरकार पक्षाचा जोरदार विरोध**

सरकारी पक्षाने गुन्ह्याचे गांभीर्य अधोरेखित करतआरोपी नुकताच अटक झाल्याचे सांगून त्याला जामीन देऊ नये, असा आग्रह धरला. जामीन दिल्यास आरोपी हा साक्षीदारांवर दबाव आणून पुरावे नष्ट होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

**न्यायालयाचे निरीक्षण**

न्यायालयाने आदेशात नमूद केले की फिर्यादी व आरोपी यांचे संबंध दीर्घकाळ टिकलेले दिसतात. योग्य अटी घालून जामीन दिल्यास तपासात अडथळा येणार नाही.

## नरनाळा महोत्सव चित्रकला स्पर्धेत सेंट पॉल्स अकॅडमीची विद्यार्थिनी कृष्णाई मंगळे प्रथम




वि. प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोट :** नरनाळा महोत्सव अंतर्गत आयोजित चित्रकला स्पर्धेत सेंट पॉल्स अकॅडमीची विद्यार्थिनी कृष्णाई धनराज मंगळे हिने प्रथम क्रमांक पटकावला.

महोत्सवात विविध सांस्कृतिक व शैक्षणिक स्पर्धा पार पडल्या. चित्रकला स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील ८५ स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत वर्ग नववीची विद्यार्थिनी कृष्णाई मंगळे हिने उत्कृष्ट कलाकृती सादर करून प्रथम पारितोषिक मिळवले.

तिला अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते ११ हजार रुपये रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लुनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे व वैशाली गावत्रे यांनी अभिनंदन केले. तिला चित्रकला शिक्षक जयवंत भवाने व संदेश चोंडेकर यांचे मार्गदर्शन लाभले

## वडाळी देशमुख संत चतुर्भुज महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव

### ◆ श्रीमद् भागवत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोट:** *ब्रह्म मूर्ती संत जगी अवतरले । उद्धराया आले दिन जना ।।*

*गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचे ।।*



वडाळी देशमुख येथे श्री संत परमहंस चतुर्भुज महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव निमित्त व ६९ वा श्रीमद भागवत अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले असून स्थळ श्री क्षेत्र द्वारका धाम प्रारंभ शनिवार २१ व सांगता. २८ असून या भागवत कथा प्रवक्ते ह भ प. वेदांत महाराज श्रीपर्ण , तर मुख्य यजमान प्रमोद अडोकार, राजेंद्र भेलकर सप्ताह मधील दैनंदिन कार्यक्रम सकाळी ५ ते. ६ काकडा, सकाळी ९ ते.१२ व. दुपारी.३ ते ५ श्रीमद् भागवत कथा वाचन,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरी कीर्तनाचा कार्यक्रम होईल, सप्ताहातील नामवंत कीर्तनकार शनिवार २१ ह भ प. शिवेंद्र महाराज काळे एकलासपूर, रविवार २२ ह भ प. हरीश महाराज पाटील अकोला, सोमवार २३ ह भ प. मनोज महाराज काकड आळंदीकर, मंगळवार २४ ह भ प. अविनाश महाराज कडू चौसाळा, बुधवार २५ ह भ प. प्रवीण महाराज कुलट आकोट, गुरुवार २६ ह भ प. पंढरीनाथ महाराज इंगोलेकर वाशिम, शुक्रवार २७ ह भ प. सुभाष महाराज बोबडे परतवाडा, सप्ताहातील अन्नदाते ओम संजय उपासे, प्रणय पुरुषोत्तम अंबळकार, संकेत पंजाब बोरोडे, रवींद्र वासुदेव भेलकर, सोहम नरेंद्र पेटे, प्रसाद निलेश बिलबिले, सचिन प्रकाश वाघ, अथर्व ईश्वर काळे, अरुण महादेव पेटे, अथर्व अरुण हुसे, वीआंश विजय काळे, सौरभ अनिल बोरोडे, पवन रामेश्वर बेलसरे, श्री चा भव्य पालखी सोहळा शनिवार २८ ला वेळ दुपारी. ३ वा. गावातून दिंडी पताकासह वाजत गाजत भव्य मिरवणूक निघेल, हरिपाठ सातसंगत श्री संत सावता माळी पुरुष व महिला भजनी मंडळ व चतुर्भुज नवदुर्गा उत्सव मंडळ वडाळी देशमुख, गायक ह भ प. श्रीकृष्ण महाराज पिंपळे, अरविंद महाराज माळी, पुरुषोत्तम महाराज मुऱ्हेकार, मंगेश महाराज अंभोरे, प्रफुल्ल महाराज रोंगे, मृदुंगाचार्य रोहन महाराज इखार आकोट, विणेकरी रघुनाथ महाराज पवार, सर्व कार्यक्रमाला मंडप लाइटिंग व्यवस्था सार्थक ऑडिओ अँड लाईट, महाराजांचे भक्त संतोष वडतकार सावरा त्यांच्याकडून अविरत मोफत सेवा चालू आहे, या विशेष उपस्थित सहकार्य सर्वश्री महादेव काळे, बापूराव लहाने, केशव बिलबिले, संजय खलोकार, रवींद्र घाटोळ, विजय रेवस्कर, प्रदीप देशमुख, रामराव काळे,ज्ञानदेव बोरोडे, शंकर देठे शंकर देठे, प्रभाकर बारब्दे,हे असून शनिवार २८ ला ह भ प वेदांत महाराज श्री परम यांचे काल्याचे किर्तन सकाळी १० ते १२ ला राहील व नंतर भव्य महाप्रसादाला सुरुवात होईल,आयोजक श्री संत चतुर्भुज महाराज सेवा मंडळ,विनीत समस्त गावकरी मंडळी वडाळी देशमुख,पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या संत चतुर्भुज महाराज पुण्यतिथी व सुवर्ण महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत अखंड हरिनाम सप्ताहाचे व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# एमडी ड्रग्ससह रागीब रब जेरबंद; शिरपूर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यात सुरू असलेल्या अमलीपदार्थविरोधी मोहिमेअंतर्गत शिरपुर पोलीस स्टेशन यांनी मोठी कारवाई करत रागीब अब्दुल अहमद रब (वय २५, रा. वणी) याला एमडी (मेफेड्रोन) या सिंथेटिक ड्रग्ससह अटक केली आहे. त्याच्याकडून ६.७ ग्रॅम एमडी अंमली पदार्थ, अंदाजे किंमत ६० हजार रुपये, जप्त करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अमलीपदार्थविरोधी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत यापूर्वी ११ फेब्रुवारी रोजी श्रेयश उर्फ गुड्डू पाटील याच्या ताब्यातून ५७.१ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ, अंदाजे किंमत ५ लाख ६० हजार रुपये, जप्त



## आंतरजिल्हा ड्रग्स तस्कराला अटक

### ९.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध तस्करीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले असून शिरपूर पोलिसांनी आंतरजिल्हा ड्रग्स तस्कराला अटक केली आहे. आरोपीकडून ५७.१ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) सह एकूण ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात पोलिस स्टेशन स्तरावर आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे सांगण्यात आले.

श्रेयश उर्फ गुड्डू शशिकांत पाटील (वय २४) रा. पुनवट ता. वणी असे आरोपीचे नाव आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार ड्रग्सविरोधी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत ११ फेब्रुवारी २०२६ रोजी शिरपूर पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पुनवट (ता. वणी) येथील व सध्या नागपूर येथे वास्तव्यास असलेला श्रेयश उर्फ गुड्डू शशिकांत पाटील (वय २४) हा वणी-शिरपूर परिसरात एमडीची विक्री करत असल्याची माहिती मिळाली.

तो वणीकडे जाणार असल्याचे समजताच पोलिसांनी चारगाव-वणी मार्गावर नाकाबंदी करून सापळा रचला. सायंकाळी पाचच्या सुमारास चारगावकडून वणीकडे जाणारी एमएच ३२ एव्ह ४१२६ क्रमांकाची सिल्वर रंगाची डॅटसन गो प्लस ही चारचाकी अडविण्यात आली.

झडतीदरम्यान आरोपीकडून ५७.१ ग्रॅम मेफेड्रोन (अंदाजे किंमत ५ लाख ६० हजार रुपये), ड्रग्स मोजण्यासाठी वापरण्यात येणारे तीन डिजिटल वजन काटे (१५ हजार रुपये), एक मोबाईल फोन (७० हजार रुपये) तसेच तस्करीसाठी वापरलेली चारचाकी (४ लाख रुपये) असा एकूण ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या काळावधीत तस्करीच्या साखळीचा सखोल तपास करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. अंमली पदार्थांच्या विक्री किंवा सेवनाबाबत माहिती असल्यास नागरिकांनी शिरपूर पोलिसांशी संपर्क साधावा, अशी विनंती करण्यात आली असून माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार संतोष मनवर, पिरज गुल्हाणे, सुरज साबळे, ईकबाल शेख, प्रशांत झोड, पंकज कुडमेथे, परमेश्वर दराडे, किरण दासरवार, सुनील दुबे यांनी केली.

करण्यात आले होते.

या प्रकरणाचा सखोल तपास करत असताना अटक आरोपी श्रेयश पाटील व अक्षय बागदडे यांनी दिलेल्या माहितीनुसार रागीब रब हा ड्रग्स तस्करीत सक्रिय असून वणी परिसरात अंमली पदार्थांची विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी वणी येथे छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याकडून एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले.

या गुन्ह्यात आतापर्यंत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून ड्रग्स तस्करीच्या मुळापर्यंत जाऊन संबंधित सर्वांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संतोष मनवर व त्यांच्या पथकाने पार पाडली.

दरम्यान, ड्रग्स विक्री किंवा सेवनाबाबत माहिती असल्यास नागरिकांनी शिरपूर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# बेपत्ता तरुणाचा मृतदेह आढळला

## आत्महत्या की घातपात?; मोबाईलने उलगडणार गूढ!

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**उमरखेड :** तालुक्यातील धनज येथील १८ वर्षीय तरुण संविधान नथ्थू ढोबळे १८ दिवसांपासून बेपत्ता होता. त्याचा शोध अखेर थरारक अवस्थेत संपुष्टात आला आहे. धनज शिवारात, स्वतःच्या शेताजवळील एका झाडाला गळफास लावलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह सापडला. मृतदेहाची अवस्था अत्यंत विद्रूप आणि छिन्नविछिन्न झालेली असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

घटनेच्या प्राथमिक माहितीनुसार, मृतदेह ओळख पटवण्यासाठी अंगावरील कपडे महत्त्वाचे ठरले. विशेष बाब म्हणजे, मृतदेहाजवळच तरुणाचा स्वतःचा मोबाईल फोन सापडला आहे. हे मोबाईल आता तपासाच्या केंद्रस्थानी आहे. कॉल रेकॉर्ड, मेसेजेस, चॅट्स आणि इतर डिजिटल पुराव्यांमधून नेमके काय घडले याचे रहस्य उलगडण्याची शक्यता आहे.



पोफाळी पोलीस स्टेशनचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा पूर्ण करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी (पोस्टमार्टेम) पाठवण्यात आला. ठाणेदार निलेश शेंबळे यांनी सांगितले की, प्रथमदर्शनी ही आत्महत्या वाटत असली तरी अंगावर कोणतेही स्पष्ट बाह्य घाव आढळले नाहीत. प्राथमिक नोंद आकस्मिक मृत्यूची घेण्यात आली आहे. मृतदेह प्रथम उमरखेड शासकीय रुग्णालयात नेला गेला; परंतु तेथे सुविधा नसल्याने यवतमाळ येथील रुग्णालयात संदर्भित करण्यात आला. पोस्टमार्टेम अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. पोलीस सर्व बाजूंनी तपास करत असून, मोबाईल फोनमधील डेटा तपासणीला प्राधान्य दिले जात आहे. या घटनेने धनज गावावर गहिरा शोक पसरला आहे. कुटुंबीय दुःखाच्या खाईत बुडाले असून, गावकरी संतप्त आणि हळहळ व्यक्त करत आहेत. "आत्महत्या की कोणीतरी नियोजित घातपात?" असा प्रश्न सर्वांच्या मनात घर करून आहे.

मोबाईल फोन हा या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा पुरावा ठरणार आहे. त्यातून प्रेमप्रकरण, आर्थिक विवाद, कौटुंबिक तणाव किंवा अन्य कोणते कारण समोर येईल? हे सत्य उघड होण्यासाठी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## इसमाला मारहाण

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जुन्या वादातून एका इसमाला गंभीर स्वरुपाची मारहाण करण्यात आली. ही घटना येथील वडगाव रोड परिसरातील कळे लेआउटमध्ये १९ फेब्रुवारी रोजी घडली. या लेआउटमधील राहणाऱ्या शेजाऱ्यांमध्ये जागेचा वाद झाला. त्यातून प्रवीण बोकडे यांना लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. त्यात त्यांच्या डोळ्याच्या वर गंभीर इजा झाली आहे. बोकडे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरुन अवधूतवाडी पोलिसांनी या प्रकरणात सुरेश माटे, प्रज्वल सुरेश माटे, अरुण माटे, अनिकेत माटे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# मार्की बु.च्या खो-खोवीरांनी जिल्हा गाजवला!



### ग्रामीण शाळांची धडपड प्रेरणादायी!

- जिल्हा परिषद शाळा बंद होण्याच्या चर्चा असतानाही मार्की बु. शाळेने दाखवले की, ग्रामीण भागातील मुले कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत! शाळेची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा कायम आहे; येथून शिकलेले अनेक विद्यार्थी आज मोठ्या पदांवर आहेत. शिक्षकांच्या शासकीय कामांमध्येही खंड पडू नये म्हणून उच्चशिक्षित स्वयंसेवक नियुक्त केले असून, त्यांचे मानधन शाळा व्यवस्थापन समिती आणि पालक देतात. मराठी माध्यमाच्या शाळा टिकवण्यासाठी चाललेली ही सामुदायिक धडपड नक्कीच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे!

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**झरी :** जिल्हा परिषद शाळांच्या क्रीडा स्पर्धेत मार्की (बु.) येथील जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळेने खो-खोमध्ये कमाल केली आहे! 'ब' गटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक पटकावले, तर 'क' गटातील मुलींच्या संघाने दमदार खेळ करत द्वितीय क्रमांक आणि रौप्य पदकावर नाव कोरले. या यशाने ग्रामीण महाराष्ट्रातील मुलांच्या क्रीडा सामर्थ्याचा डंका वाजला आहे!

नेहरू स्टेडियम, झरी येथे ५ ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान झालेल्या या जिल्हास्तरीय स्पर्धेत मार्की बु. शाळेच्या खेळाडूंनी जबरदस्त प्रदर्शन केले. मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात विरोधकांना धूळ चारली, तर मुलींनीही शेवटपर्यंत झुंज देत रौप्य पदक निश्चित केले.

या ऐतिहासिक यशाचा जल्लोष



साजरा करण्यासाठी शिवजयंतीनिमित्त (दि. १९ फेब्रुवारी) गावातून वादळी मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशा, फटाके आणि फुलांच्या वर्षावात विजेत्या खेळाडूंचे गावकऱ्यांनी जल्लोषपूर्ण स्वागत केले. प्रथम क्रमांकाच्या मुलांच्या संघाला सायकली आणि द्वितीय क्रमांकाच्या मुलींच्या संघाला स्कूल बॅग पारितोषिक म्हणून भेट देण्यात आल्या. गावकऱ्यांनी हातात फलक, फुले घेऊन खेळाडूंना हिरो बनवले!

मुख्याध्यापक विनोद पोलचेट्टीवार, सहायक शिक्षक एडोळे सर, खपले सर, स्वयंसेवक कपिल टोपावर, ठावरी मॅडम, मेघा मासूलकर आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सभापती विजय केलझरकर यांच्या अथक मार्गदर्शनामुळे हे यश मिळाले. त्यांचेही कार्यक्रमात विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास गटविकास अधिकारी रवींद्र सांगळे, गटशिक्षणाधिकारी निलेश खैरनार, सरपंच दिवाकर उईके, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि शेकडो उत्साही गावकरी उपस्थित होते.

## विहीर खोदकामात मजूराचा मृत्यु

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**उमरखेड :** विहीर खोदकाम सुरू असताना उडालेल्या दगडाचा जोरदार फटका बसल्याने एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अंबाळी शिवारात घडली. गंभीर जखमी अवस्थेत उपचारासाठी नांदेड येथे नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला.

कोंडबा उर्फ कैलास अडकिने (वय ५०, रा. ब्राह्मणगाव) असे मृत मजुराचे नाव आहे. दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास ते अंबाळी शेत शिवारात विहिरीचे खोदकाम करत होते. खोदकामादरम्यान अचानक मोठा दगड उडून त्यांच्या डोक्यात आदळला. यात ते गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर विहिरीवर काम करणाऱ्या इतर मजुरांनी त्यांना तातडीने उमरखेड येथील रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्याचा सल्ला दिला. मात्र नांदेडकडे नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृतकाची पत्नी अनुसया अडकिने यांनी पोफाळी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. ठाणेदार निलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, विहीर खोदकाम करताना आवश्यक सुरक्षाविषयक उपाययोजना करणे गरजेचे असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# दुचाकी चोरणारे दोन चोरटे जेरबंद

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**पांढरकवडा :** पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे दाखल मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून एकूण चार मोटारसायकली हस्तगत केल्या आहेत. या कारवाईत १ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे दाखल अपराध क्र. २९३/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या. संहिता अंतर्गत चोरीस गेलेल्या मोटारसायकलचा तपास सुरू असताना तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे रेकॉर्डवरील आरोपी राजू लक्ष्मण मंचलवार (वय ३४, रा. इंदिरा नगर, पांढरकवडा) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याच्याकडून सदर गुन्ह्यातील मोटारसायकल जप्त करण्यात आली. पुढील चौकशीत त्याने आणखी दोन मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. पेट्रोल संपल्याने त्या अज्ञात स्थळी सोडून दिल्याची माहिती त्याने दिली. त्यानुसार पोलिसांनी त्या दोन मोटारसायकलीही हस्तगत केल्या. अशाप्रकारे त्याच्याकडून एकूण तीन गुन्हे उघडकीस आले. तसेच अपराध क्र. २७५/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या. संहिता अंतर्गत दाखल गुन्ह्यात विवेक अशोक चौधरी (वय ३४, रा. गणेशपुर वाई, ह.मु. आखाडा वार्ड, पांढरकवडा) याच्याकडून एमएच २९ बीजी ५९२७ क्रमांकाची ५९ हजार रुपये किंमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शोध पथकाने केली.

# लोणी येथे संत सेवालाल महाराज मंदिराचे उद्घाटन

## आई जगदंबेच्या मूर्तीची विधिवत स्थापना

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**आर्णी :** लोणी गावात संत सेवालाल महाराज यांच्या नावे नवीन मंदिराचे उद्घाटन पार पडले. यावेळी आई जगदंबेच्या मूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली, तसेच संत सेवालाल महाराजांची पगडी आणि चरण पादुका स्थापित करून पूजनाचा पवित्र सोहळा संपन्न झाला.

या मंगल प्रसंगी श्री राजेश आडे आणि सौ. नीता आडे यांच्या हस्ते पूजा-अर्चना आणि उद्घाटन करण्यात आले. लोणी गावातील ग्रामस्थ, भक्तगण, तरुण मंडळी आणि माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला, ज्यात सर्वांनी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतला.





यावेळी सर्वांना उत्तम आरोग्य, सर्वांगीण विकास आणि आनंदी, समृद्ध जीवन मिळावे, अशी जगदंबेच्या पवित्र चरणी प्रार्थना करण्यात आली. अशा धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात श्रद्धा, एकता आणि आध्यात्मिक बळ अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनतर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**पुसद :** रयतेचे कैवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनतर्फे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील 'वैराग्यमूर्ती कर्मयोगी संत गाडगे बाबा स्मृती स्थळ', जाधव बाग, पार्डी रोड, लिंबी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ व बालशिवराय यांच्या मूर्तींचे पूजन आदर्श शेतकरी दत्तात्रय जाधव, डॉ. सुधीर झीलपीलवार व डॉ. कैलास बजाज यांच्या हस्ते करण्यात आले.



यानंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

जयंतीनिमित्त आरोग्य धनसंपदा सायकल ग्रुप, पुसद व वंदे मातरम् सायकल ग्रुप, पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते 'संत गाडगे बाबा स्मृती स्थळ', जाधव बाग, पार्डी रोड, लिंबी या दरम्यान सुमारे १० किलोमीटर अंतराची सायकल रॅली काढण्यात आली. रॅलीचे मार्गदर्शन आरोग्य धनसंपदा सायकल ग्रुपचे अध्यक्ष पवन बोजेवार यांनी केले.

या रॅलीत डॉ. सुधीर झीलपीलवार, डॉ. कैलास बजाज, सुधाकर पुलाते, मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था पुसद, वसुंधरा बहुउद्देशीय संस्था पुसद, संभाजी ब्रिगेड महिला ग्रुप तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

रॅली कार्यक्रमस्थळी पोहोचताच माणुसकीची भिंतचे अध्यक्ष गजानन जाधव यांनी सहभागींचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मिशन ग्रीनचे अध्यक्ष रमेश डंबोळे यांनी केले.

# मोबाईल टॉवर कामगारांचे बेमुदत धरणे

## पगारवाढ, विमा, किमान वेतन, सुरक्षा किटची मागणी

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिओ टेलिकॉम अंतर्गत टॉवर देखभाल व दुरुस्तीचे काम करणाऱ्या प्रताप टेक्नोक्रॅट्स प्रा. लि. (जयपूर, राजस्थान) या कंपनीविरोधात मोबाईल टॉवर कामगार (टेक्निशियन) संघटनेच्या वतीने आझाद मैदानात बेमुदत धरणे आंदोलन सुरू झाले आहे.

दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेपासून सुरू झालेल्या या आंदोलनात कामगारांनी कंपनीकडून होणाऱ्या अमानुष शोषणाविरोधात तीव्र निदर्शने केली.

कामगारांनी सांगितले की, गेल्या १० वर्षांपासून ते टॉवर टेक्निशियन/रिगर म्हणून काम करत आहेत, पण कामगार कायद्यानुसार मिळणारे कोणतेही लाभ मिळाले नाहीत. पगारवाढ, विमा, सामाजिक सुरक्षा, किमान वेतन यांचा अभाव असल्याने अनेकदा तक्रारी केल्या, पण कंपनीने दुर्लक्ष केले. उलट कामावरून कमी करण्याच्या व खोट्या केसेस दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे मागील १०-१२ दिवसांपासून काम बंद आहे.





**कामगारांच्या प्रमुख मागण्या :** बेकायदेशीररित्या कामावरून कमी न करणे व धमक्या थांबवणे. कामगार कायद्यानुसार किमान वेतन, पगारवाढ देणे. डिझेल जनरेटर हाय CPH च्या नावावर पगार कपात थांबवणे. सामाजिक सुरक्षा, अपघाती व मृत्यू विमा लागू करणे. सुरक्षा किट पुरवणे. पगाराची तारीख निश्चित करणे. कामगारांना कायम करणे. आंदोलनातील कामगारांवर गुन्हे दाखल न करणे. मोबाईल टॉवर कामगार (टेक्निशियन) संघटना (रजि. नं. एमएसके जे-१९७१, स्थापना २ फेब्रुवारी २०१६) च्या माध्यमातून हे आंदोलन सुरू असून, निवेदन जिल्हाधिकारी यांच्यासह पोलीस अधीक्षक व पोलीस निरीक्षक यवतमाळ यांना देण्यात आले आहे.

या आंदोलनामुळे यवतमाळ जिल्ह्यातील काही भागांत जिओ नेटवर्क सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कामगारांनी स्पष्ट केले की, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही. प्रशासनाने त्वरित चौकशी करून कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी ते करीत आहेत.

# सावळेश्वरच्या तरुणांचा माणुसकीचा 'पॅटर्न'; महिलेसाठी जमवला २८ हजारांचा निधी

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**ढाणकी :** शेतात कापूस वेचणी करत असताना रानडुकराच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेच्या मदतीला सावळेश्वर येथील तरुणांनी धाव घेत माणुसकीचे दर्शन घडवले. सोशल मीडियाच्या माध्यमातून तब्बल २८ हजार ६०९ रुपयांचा निधी जमा करून तो संबंधित कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आला.

सावळेश्वर येथील करुणा दलितानंद काळबांडे या शेतात काम करत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. या भीषण हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर यवतमाळ येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने उपचारांचा खर्च भागवणे कठीण झाले होते.

हीबाब लक्षात येताच गावातील



काही युवकांनी पुढाकार घेत मदतीचे आवाहन करण्याचा निर्णय घेतला. फेसबुक व व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून त्यांनी परिसरातील नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी आपल्या परीने आर्थिक मदत करत 'खारीचा वाटा' उचलला.

अवघ्या काही दिवसांत २८ हजार ६०९ रुपयांची रक्कम जमा झाली. ही संपूर्ण रक्कम युवकांनी करुणा काळबांडे यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केली. या मदतीमुळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून "ही मदत आमच्यासाठी केवळ आर्थिक नाही, तर मानसिक आधारही आहे," अशी भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली.

आजच्या काळात सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करून सावळेश्वरच्या तरुणांनी समाजासमोर माणुसकीचा आदर्श 'पॅटर्न' उभा केला आहे. परिसरातून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.




शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी!

सिटी न्यूज सुपरफास्ट शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६
माणुसकीला रोजच हरताळ...
रेल्वे पार्कींग वाल्याची पोलीसांनाही शिवीगाळ!
अरेरावीची ठेकेदारी, म्हने कायद्यापेक्षाही भारी

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरी रोजच पुन्हा-पुन्हा, पोलिसांनीच दाखल केला गुन्हा!
काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...
दादागिरीची हद्द, ठेका करा रद्द!
रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी केली खुद्द

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्या...
ठेकेदाराची लूट, अधिकाऱ्यांची सूट!
दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी उभारणार लढा
सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

गुरूवार दि. १९ जानेवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...
लूटण्याची सुविधा, मॅनेज निविदा!
दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी...

## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...

# जबरदस्ती, ठेकेदाराची मस्ती, प्रवाशांना धास्ती!

## काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात असलेल्या पार्कींगचा ठेका मागील अनेक वर्षापासून एकाच ठेकेदाराला रेल्वे प्रशासन देत असल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. पार्कींगचा ठेकेदार हा वादग्रस्त असून त्याच्या पार्कींग करण्याच्या दादागिरीने वाशीम परिसरातील सर्व वाहनचालक परेशान झाल्याचे समजते. ठेकेदाराच्या दादागिरीला रेल्वेचे अधिकारी आणि रेल्वे पोलीसांचे आर्थिक पाठबळ असल्यामुळेच त्या ठेकेदाराकडून दररोज रेल्वे स्टेशनवर ये-जा करणाऱ्या वाहन चालकांची खुलेआम आर्थिक लूट सुरू असल्याचे वास्तव आहे. त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करण्यासाठी विविध सामाजिक संघटना व ग्राहक संघटनांनी पुढाकार घेतला असल्याचे समजते.

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षापासून दुचाकी, तिनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्कींगची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. रेल्वे प्रशासनाने व अनेक वर्षापासून पार्कींगचा ठेका घेणाऱ्या वादग्रस्त ठेकेदाराने वाहनांच्या सुरक्षिततेसाठी टिनशेडची सुविधा सुद्धा उपलब्ध करुन दिली नाही. पार्कींगसाठी शेड नसल्यामुळे वाहन चालकांची दररोज पार्कींगमध्ये ठेवलेली वाहने उन्ह, वारा, पावसाचा त्रास सहन करत असल्याचे चित्र आहे. रेल्वेस्टेशन वर येणाऱ्या रेल्वे गाडीच्या वेळेवर अथवा वेळेच्या अगोदर प्रवाशांना, नातेवाईकांना आणून सोडण्यासाठी अथवा घेण्यासाठी येणाऱ्या आप्तेष्ठांना सुद्धा जबरीने, दादागिरी करून पार्कींगचा वादग्रस्त ठेकेदार वाहने पार्कींगमध्येच लावण्याची सक्ती करून वाहनचालक, मालकांची आर्थिक लूट करत आहे. रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमोर व स्टेशनवर ड्युटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संगनमतानेच वादग्रस्त ठेकेदाराची अरेरावी व दादागिरी खुलेआम सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. रेल्वे पार्कींगचा ठेकेदार असलेल्या ठाकूरची गुन्हेगारीची पार्श्वभूमी असल्याची चर्चा आहे. पार्कींगचा ठेका घेण्याअगोदर ठाकूर ने रेल्वे आवाराच्या गेटला



लागून असलेल्या एका गरीब व्यक्तीच्या जागेवर अतिक्रमण केले होते. त्या गरीब माणसाची जागा सोडण्यासाठी ठाकूरने दादागिरी करून त्या गरीब माणसाला खूप त्रास दिला होता. ठाकूरच्या जाचाला कंटाळून त्या गरीब माणसाला त्याच्या मालकीची आणि व्यवसायासाठी उपयोगी असलेली जागा कमी भावाने विकावी लागल्याची चर्चा आहे. रेल्वे स्टेशनच्या आवारात होणाऱ्या गुन्हेगारीच्या प्रकारात सहभागी असलेल्या आरोपींना सुद्धा वादग्रस्त ठेकेदाराची साथ असल्याचीही स्टेशन परिसरात चर्चा आहे. वाशीम शहर पोलीस ठाण्यात पार्कींगच्या वादग्रस्त ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याचे समजते. वाशीम शहर पोलीसांनी वादग्रस्त ठेकेदाराची कसून चौकशी केल्यास अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करावा. यापुढील पार्कींगचा ठेका देण्यापुर्वी रेल्वे प्रशासनाने पारदर्शक प्रक्रिया राबवावी, वाशीम जिल्ह्यात जास्त खप असलेल्या मराठी वृत्तपत्रात पार्कींगच्या ठेक्याची जाहिरात प्रकाशीत करावी तसेच पार्कींगसाठी टिनशेड उपलब्ध करून देण्याची मागणीही विविध सामाजिक संघटना आणि ग्राहक संघटनेने रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे समजते.

## थोडक्यात

### छत्रपती शिवाजी महाराज युगप्रवर्तक -प्रा. सुनिल सपकाळ



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आदर्श राजे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते' असे गौरवोद्गार प्रा. सुनिल सपकाळ यांनी काढले.

पिंप्री अवगण येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय व स्व. मधुकरराव ल. सपकाळ कला व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १९ फेब्रुवारी रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधून कु. मोहिनी कांबळे हिने शिवचरित्रावर गीत सादर केले, तर कु. ज्ञानेश्वरी अवगण हिने जोशपूर्ण पोवाडा सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार शिंगणे सर यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थिती म्हणून ज्येष्ठ शिक्षक राठोड सर, गोरवे सर, गोगे सर, भुसारी सर, कुळकर्णी सर, चेतन वानखडे सर, किशोर लांभाडे सर, संतोष वानखडे सर आणि सतीश यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी प्रितम गौपाल सर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

### य.च. महाविद्यालयाचा वरुड येथे शिवजयंती उत्सव



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दत्तक ग्राम वरुड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या मार्गदर्शनात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातून भव्य रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री उमेशभाऊ गावंडे, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती मंगरूळपीर हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये भास्करराव गायकवाड निलेश चौधरी संदेश मुळे महालेभाऊ डॉ. मधुकर ताकतोडे, रासेयो. कार्यक्रम अधिकारी, डॉ. संजीव इंगळे, डॉ. साहेबराव पवार, डॉ. प्रमोद देवके तसेच गावातील समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संजीव इंगळे, डॉ. मधुकर ताकतोडे, डॉ. साहेबराव पवार डॉ. प्रमोद देवके, रासेयो, स्वयंसेवक गावातील समस्त गावकरी मंडळींनी अथक परिश्रम घेतले.

### जिल्हाधिकारी कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दि. २० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अधिकारी व कर्मचारी सुध्दा उपस्थित होते. उपस्थितांनी सुध्दा बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## जिल्ह्यातील सामूहिक कॉपी प्रकरणात...


# अडकले बालक, आक्रमक झाले पालक, त्रस्त झाले संस्थाचालक!

## ससाने यांच्या धडाकेबाज कारवाईने धाबे दणाणले ...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यात बारावी व दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये दरवर्षी गैरप्रकार करून लाखो रूपयांची कमाई करणाऱ्या चांडाळ चौकडीने कर्तव्यदक्ष प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांच्या भरारी पथकाची धास्ती घेतल्याची चर्चा आहे. सामूहिक कॉपी प्रकरणात विद्यार्थ्यासह शिक्षकांवर कारवाई केल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली सामूहिक कॉपी प्रकरणात शिक्षकांसह बालकही अडकले आहेत. त्यामुळे पालक आक्रमक होवून त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. शिक्षणाधिकारी ससाने यांच्या धडक कारवाईमुळे संस्थाचालक त्रस्त झाले आहेत.





वाशिमच्या टो येथील श्री मैनागिरी महाराज विद्यालयातील सामूहिक कॉपी प्रकरणी आता पालक वर्ग सुद्धा आक्रमक झाले आहे. निष्पाप विद्यार्थ्यावर झालेल्या मानसिक आणि शैक्षणिक अन्याय झाला असून या प्रकरणाचे तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी पालकांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठत निवेदन दिले आहे. १६ फेब्रुवारी रोजी प्राथमिक शिक्षणाधिकारी ससाने आणि त्यांच्या भरारी पथकाने वाशीम च्या टो येथील मैनागिरी महाराज कनिष्ठ महाविद्यालय येथील परीक्षा केंद्राची पाहणी केली. दरम्यान या केंद्रावर एकूण ५८१ विद्यार्थी उपस्थित होते. या मधील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची नमुना तपासणी केली असता, बहुसंख्य विद्यार्थ्यांची उत्तरे शब्दशः समान असल्याचे आढळून आले. यावरून मैनागिरी महाराज महाविद्यालयात ५८१ विद्यार्थ्यांनी सामुदायिक कॉपी केल्याचे उघड झाले होते . या प्रकरणी शिक्षण विभागाकडून परीक्षा केंद्रावरच्या दोषी असलेल्या २६ शिक्षक निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर आता या कारवाईचा शिक्षक संघटनांकडून निषेध करण्यात येत होतं. या कारवाई विरुद्ध पालक वर्ग आक्रमक झाल्याचे बघायला मिळाले. या कारवाईमुळे निष्पाप विद्यार्थ्यावर या अन्याय झाल्याचं पालकांकडून सांगितले जात आहे. याप्रकरणी संबंधित पालकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत योग्य न्याय देण्याची मागणी केली आहे.

आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडून प्राथमिक शिक्षण विभागाचा कारभार पारदर्शक करण्यासाठी त्यांचे योगदान कौतुकास्पद आहे. प्रारंभी संजय ससाने यांना परीक्षा काळात भरारी पथकापासुन दूर ठेवण्यासाठी दलालांनी पुढाकार घेतला. परंतु ससाने साहेबांच्या प्रामाणिकपणाची दखल जिल्हाधिकाऱ्यांनी घेवून ससाने साहेबांच्या 'वन मॅन आर्मी 'ला हिरवी झेंडी दिली. ससाने साहेबांनी आपल्या धडाकेबाज कारवाईस जोरदार प्रारंभ केला आहे. त्यांच्या भरारी पथकाची केंद्र संचालक, पर्यवेक्षकांनी धास्ती घेतली आहे.

### विद्यार्थी व शिक्षकांवर कारवाई थेट, माजी आ. देशपांडे घेणार शिक्षण मंत्र्यांची भेट!

#### महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडेही कायदेशीर बाजू मांडणार

वाशीम जिल्ह्यातील सामूहिक कॉपी प्रकरण सध्या संपूर्ण महाराष्ट्रात गाजत आहे. कॉपीचे कोणीच समर्थन करणार नाही पण सामूहिक कॉपी प्रकरणात सरसकट सर्व विद्यार्थ्यांवर कार्यवाही अन्यायकारक असल्याचे मत माजी शिक्षण राज्यमंत्री दर्जा तथा अमरावती विभागाचे माजी आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे यांनी व्यक्त केले आहे. कॉपी प्रकरणात जे खरच दोषी असतील त्यांचे समर्थन नाही परंतु जवळ जवळ ५८१ विद्यार्थ्यांवर सरसकट कार्यवाही म्हणजे त्या विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणे ठरणार आहे. त्यामुळे ज्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली तीही संशयाच्या भोवऱ्यात येते.



या सर्व प्रकरणी विद्यार्थ्यांची खचलेली मानसिकता लक्षात घेऊन आपण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे कायदेशीर युक्तिवाद करून दाद मागणार असून शिक्षक आणि विद्यार्थी यांना न्याय मिळावा यासाठी शिक्षण मंत्री ना. दादा भुसे यांची भेट घेणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनी केले आहे. वाशीम जिल्ह्यातील सामूहिक कॉपी प्रकरण कायदेशीर बाजू मांडण्याचे प्रकरण असून आंदोलन किंवा राजकारणाचा मुद्दा नाही. शिक्षक आणि विद्यार्थ्यांना योग्य न्याय मिळण्यासाठी योग्य ठिकाणी अभ्यासपूर्ण बाजू मांडणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले.


मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
कॉपीमुक्त अभियान नव्हे, कॉपीयुक्त अभियान!
*संस्थानिक, मुख्याध्यापक, केंद्रसंचालक, पर्यवेक्षक बैठेपथक आणि पोलिसांच्या संगनमताने परीक्षा केंद्रावर गैरप्रकार
*वाशीम जिल्ह्यात बारावीच्या परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा

बुधवार दि. १८ जानेवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
कारवाईत नको भेदभाव, कर्तव्यदक्ष म्हणून नाव!

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
कॉपीमुक्त अभियान नव्हे कॉपीयुक्त अभियान....
परिक्षा नव्हे सत्व परिक्षा, ही तर शिक्षा!

# शिरपूर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांचा हलगर्जीपणा!

## *प्रसूतीसाठी आलेल्या महिलेवर संकट * सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर तत्काळ कारवाईची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे प्रसूतीसाठी आलेल्या महिलेची योग्य काळजी न घेतल्यामुळे महिलेवर संकट ओढवल्याची घटना ३ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणामुळे परिसरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. तथापि, संबंधित स्टाफ नर्स व डॉक्टर वर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, अशी ठाम मागणी कुटुंबीयांनी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे केली आहे.





निवेदनानुसार, शिरपूर येथील विशाल गजानन गुंजकर यांनी तालुका आरोग्य अधिकारी, मालेगाव यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता त्यांच्या बहिणीला प्रसूती वेदना सुरू झाल्याने शिरपूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्या ठिकाणी डॉक्टर उपस्थित नव्हते. रुग्णाच्या नातेवाईकांनी विनवणी केल्यानंतर प्रसूती करण्यात आली. प्रसूतीनंतर नवजात बालिकेची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. मात्र, वेळेत योग्य उपचार व आवश्यक सुविधा न दिल्यामुळेच बाळाची प्रकृती चिंताजनक झाल्याचा आरोप तक्रारीतून करण्यात आला आहे. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, संबंधित स्टाफ नर्स व डॉक्टरांकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही. बालिकेची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात येऊनही तातडीची वैद्यकीय मदत व रेफर प्रक्रियेत विलंब करण्यात आल्याने बालिकेची तब्येत अधिक खालावली. त्यानंतर नाईलाजाने प्रसूत महिलेला वाशिम येथे हलविण्यात आले. याप्रकरणी संबंधित डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांनी जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनास जाब विचारला. मात्र, समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी थेट तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे धाव घेतली. घटनेच्या संबंधित कालावधीमधील सीसीटीव्ही फुटेज ची तपासणी करून जोशी डॉक्टर व इतरांवर कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये यासाठी ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या घटनेमुळे मालेगाव तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन न्याय द्यावा, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे. या घटनेनंतर काही दिवसात पुन्हा असाच प्रकार या रुग्णालयात घडल्याची ही चर्चा आहे. त्यामुळे रुग्णालयातील डॉक्टरांच्या कार्य शैलीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून दखल घेतली जाईल का? असा प्रश्न शिरपूर येथे चर्चिला जात आहे.

# शहरात भुरट्या चोरट्यांचा आतंक!





● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहरात भरदिवसा घरे फोड्या होत आहेत. गाड्यांना आगी लावल्या जात आहेत. काही क्षणातच भरदिवसा मोटर सायकल चोरी होत आहेत. ह्या घटना सिसीटीव्हीत कैद झाल्या आहेत. भुरट्या चोरट्यांनी आता दिवसा व रात्री धुमाकूळ घालायला सुरूवात केली आहे.

शहराच्या विविध भागात विविध भागामध्ये दुचाकी चोरी, दुचाकीच्या बॅटऱ्या व विविध भागासह चारचाकी गाड्यांचेही मोठ्या प्रमाणात साहित्य चोरी जाण्याच घटनेमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाढ झाली होती. यावर कळस म्हणजे आता भुरट्या चोरट्यांनी घरासमोरील गाड्या पेटून द्यायला सुरूवात केली आहे. तर दुसरीकडे गॅरेजला आग लावली आहे. वाढत्या चोऱ्यांमुळे चौकासह विविध भागातील नागरीकांमध्ये चोरट्यांची दहशत निर्माण झाली आहे. वाशिम शहर पोलीसांनी या चोरट्यांचा त्वरीत बंदोबस्त लावून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी या भागातील नागरिकांमधून केल्या जात आहे. या सर्व छोट्या मोठ्या चोऱ्यांसह या भागात सक्रीय असलेले चोरटे घरातील साहित्याची सुध्दा चोरी करत असल्याच्या घटनांमुळे येथील नागरिक भयभित झाले आहेत.

या सर्व प्रकाराबाबत या भागातील नागरिकांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रारी देऊनही आजपर्यंत शहर पोलीसांनी चोरट्यांना पकडण्यासाठी पुढाकार घेतला नसल्याची खंत या भागातील नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# डासांनी उडवली शहरवासियांची झोप !

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** अकोला शहरातील अनेक भागात कचऱ्याचे ढिगारे आणि खराब ड्रेनेजमुळे डास आणि इतर कीटकांची पैदास होत आहे. त्यामुळे



नागरिकांची पर झोपच उडून गेली आहे. शहराच्या अनेक भागात विशेषता मोकळ्या जागेत साचलेले पाणी हे डासांचे प्रमुख प्रजनन केंद्र आहे. दिवसा आणि रात्री डासांमुळे लोकांसाठी समस्या निर्माण होत आहेत. ज्यामुळे डेंग्यू आणि मलेरिया सारखे आजारांचा धोका वाढला आहे.आज शहरातील सर्व दवाखान्यांमध्ये तापाने फनफनलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत आहेत. शहराला विभाजित करणाऱ्या मोर्णा नदीत साचलेली घाण आणि जलकुंभीने परत आपले साम्राज्य निर्माण केल्याने डासांच्या उत्पतीत मोठी वाढ झाली आहे. विशेषतः नदी किनाऱ्यावर राहणाऱ्या नागरिकांना डासांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत आहे. शहरातील घाणेरडी गटारे आणि फॉगिंग चा अभाव यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. डासांची संख्या वाढल्याने शहरवासीयांची रात्रीची झोप हिरावून घेतली आहे. घरगुती स्वच्छता सुधारली असली तरी प्रत्येक घरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. रात्रीच्या वेळीच नाही तर दिवसा सुद्धा डास त्रासदायक ठरत आहेत.

## तापांच्या रुग्णांनी सर्व दवाखाने फुल
## शहरात फॉगिंग मशीन फिरवण्याची नागरिकांची मागणी

### रिकाम्या जागेत साचलेल्या घाणेरड्या पाण्यात डासांची पैदास!

शहरातील अनेक भागात वर्षानुवर्ष वस्ती आहे. तरीही योग्य ड्रेनेज व्यवस्था अद्यापही निर्माण न झाल्यामुळे घरांमधून निघणारे सांडपाणी एका प्लॉटवरून दुसऱ्या प्लॉटवर वाहते. त्यामुळे डास आणि माशांसह विविध प्रकारचे कीटक घाणेरड्या पाण्यात वाढतात. ज्यामध्ये डास सर्वात जास्त प्रमाणात आढळतात. जसजशी संध्याकाळ जवळ येते तसतसे शहरात डासांचा धोका वाढला आहे, आणि लोकांची रात्रीची झोप उडाली आहे. मोर्णा नदीतील जलकुंभी साफ करण्यासाठी आतापर्यंत महापालिकेने करोडो रुपये खर्च केले आहेत. त्याचप्रमाणे शहरातील सफाई व्यवस्थेवर सुद्धा दरमहा लाखो रुपये खर्च होत आहेत. या उपरही परिस्थिती बिकट होत चालली आहे. आता तर महापालिकेत प्रशासक राज म्हटल्यानंतर लोकनियुक्त जनप्रतिनिधींचे सरकार आले आहे. आपल्या पहिल्याच आमसभेत पडीत वार्डाचा विषय मंजूर करीत सत्ताधाऱ्यांनी आपल्या नगरसेवकांची सोय लावून ठेवली आहे. त्यामुळे शहरात परत सफाईचा बोजवारा उडणे निश्चित आहे. अद्यापही डासांच्या बंदोबस्तासाठी फॉगिंग मशीन चा उपयोग होत नसल्याने शहरात डासांच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. या समस्ये कड़े महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शहरातील लाखो नागरिकांची झोप मात्र उडाली आहे

### शहरातील कचरा सफाईवर दरमहा

लाखो खर्च परंतु समस्या कायम! शहराच्या अनेक भागात घाणेरडे पाणी साचल्याने पर्यावरण ही प्रदूषित होत आहे .योग्य गटारे नसल्याने स्वच्छता कर्मचारी अनेकदा या भागांना भेट देत नाहीत. त्यामुळे परिसरातील रहिवाशांना गटारे साफ करण्यासाठी स्वतः फावडे हातात घ्यावी लागत आहेत. योग्य गटारे नसल्यामुळे घाण निर्माण होते. तरीही परिस्थिती मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित आहे.

# वऱ्हाडी जत्रेत नियमांची पायमल्ली ?



प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

## ♦ शासकीय प्रदर्शनात घरगुती गॅस सिलेंडरचा वापर

**अकोला :** जिल्हा परिषद प्रशासनाच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत उमेद प्रकल्पांतर्गत आयोजित 'वऱ्हाडी जत्रा – विभागीय स्तरावरची प्रदर्शन मध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

घरगुती गॅस सिलेंडरचा काळा बाजारात तर मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. एवढंच नाही तर घरगुती गॅस सिलेंडर चा वापर आता खाजगी खानावळ, हॉटेल, कॅटिंग तसेच विविध ठिकाणी लागणाऱ्या प्रदर्शनी मधील स्टॉल वर सुद्धा होत आहे. हाच प्रकार अकोला शहरात सुरू असलेल्या वऱ्हाडी जत्रा या प्रदर्शन मध्ये पाहायला मिळाला आहे, विशेष म्हणजे हा कार्यक्रम पूर्णतः शासकीय असून, वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत सुरू असताना कायद्याचे स्पष्ट उल्लंघन झाल्याचा आरोप होत आहे. शहरातील शास्त्री स्टेडियम येथे भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री ?ड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते झाले. मात्र, याच प्रदर्शनातील खाद्यपदार्थांच्या अनेक स्टॉल्सवर व्यावसायिक वापरासाठी आवश्यक असलेल्या कमर्शियल (लाल) गॅस सिलेंडरऐवजी थेट घरगुती सिलेंडरचा वापर करण्यात आल्याचे प्रत्यक्ष पाहायला मिळाले.

घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर हा आवश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा असताना, सामान्य हॉटेल, टपरी चालकांवर तत्काळ कारवाई करणारे प्रशासन स्वतःच्या कार्यक्रमात मात्र नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसून आले आहे. यामुळे 'कायद्याचे बंधन सर्वसामान्य नागरिकांसाठीच असून, शासकीय कार्यक्रमांना सूट आहे काय?' असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

दररोज हजारो नागरिक, महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती असलेल्या या प्रदर्शनात घरगुती सिलेंडरचा वापर हा गंभीर अग्निसुरक्षा धोका ठरू शकतो. एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्नही उपस्थित झाला आहे.



रमजान निमित्त शहरातील कच्छी मशीदी सह विविध मशिदींवर रोषणाई करण्यात आली आहे. सध्या रोजे सुरू आहेत. त्यामुळे मोहमद अली रोडवर रात्री उशिरापर्यंत परिसर जगमगत आहे.

# बसस्थानकात कचऱ्याचा ढीग ; प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** अकोला मुख्य बसस्थानकात स्वच्छता अभियान मोठ्या प्रमाणात राबविले जात असल्याचे दिसत असले, तरी प्रत्यक्षात परिसरात कचऱ्याची समस्या गंभीर बनली आहे. बस स्थानकातील विविध ठिकाणी ठेवण्यात आलेल्या कचरापेट्या रोजच्या कचऱ्याने लबालब भरल्या असून, त्यातून प्लॅटफॉर्म परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे. प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.



या दुर्गंधीमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, आरोग्याच्या दृष्टीनेही ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे. स्वच्छता अभियानासोबतच कचरापेट्यांची नियमित साफसफाई व कचऱ्याची वेळेवर विल्हेवाट लावणे अत्यावश्यक असल्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. प्रवाशांनी या समस्येकडे लक्ष वेधत संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, कचरापेट्या त्वरित रिकाम्या करून त्यांची स्वच्छता करावी, अशी मागणी केली आहे. अकोला मुख्य बस स्थानक परिसरात स्वच्छतेच्या कामात सातत्य राखले नाही, तर स्वच्छता अभियानाचा उद्देश अपूर्ण राहील, अशी प्रतिक्रिया नागरिक व प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

# पळस देतो रंगोत्सवाची चाहुल



**अकोला :** पळसाची लाल फूले झाडांवर दिसू लागली की रंगोत्सवाची चाहुल लागते. शहरात तसेच माळरानावर पळसाची झाडे बहरलेली असतात. रंगोत्सवात नैसर्गिक रंगांचा वापर करण्याचे आवाहन केले जाते. त्यासाठी पळस फूले वापरली जातात. नैसर्गिक गुणधर्म असलेला पळस गुणकारी आहे. न्यू तापडिया नगरातील नाथ शक्तीपीठ कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पळस छान फुलला आहे. यावर आज पहाटे पोपटांची शाळा भरलेली दिसली. वाटसरूंच्या आवाजाने पोपट दुसऱ्या झाडावर जाऊन विसावले.

# महिला पोलिस भरती प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** महिला पोलिस भरती प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महिला उमेदवारांची मोठी उपस्थिती पाहायला मिळत आहे. पहाटेपासूनच विविध ठिकाणाहून आलेल्या महिला उमेदवारांनी मैदानावर हजेरी लावली.

भरती प्रक्रियेला आज मोठ्या संख्येने महिला उमेदवारांनी हजेरी लावली. शारीरिक चाचणीसाठी उमेदवार सकाळी लवकरच निर्धारित मैदानावर दाखल झाल्या होत्या. धावणे, गोळाफेक आणि इतर शारीरिक पात्रता चाचण्या काटेकोरपणे पार पडत आहेत.भरती प्रक्रियेदरम्यान पोलीस प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. उमेदवारांची कागदपत्रे तपासूनच मैदानात प्रवेश दिला जात आहे. कोणताही



गैरप्रकार होऊ नये यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. महिला उमेदवारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत असून, पोलीस दलात सेवा देण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. अनेक उमेदवार ग्रामीण भागातून आल्या असून, कुटुंबियांनीही त्यांना पाठिंबा दिल्याचे चित्र पाहायला मिळाले.दरम्यान, प्रशासनाने उमेदवारांसाठी पिण्याच्या पाण्याची व प्राथमिक वैद्यकीय सुविधांची व्यवस्था केली आहे. भरती प्रक्रिया पुढील काही दिवस सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# बसस्थानक परिसरात अवैध वाहतूक सुरूच

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील मुख्य बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर बंदी घालण्याचे आदेश देण्यात आले होते. बसस्थानक परिसरात कोणतीही खासगी अथवा अवैध वाहतूक करणारी वाहने उभी राहू नयेत, असे स्पष्ट निर्देश असतानाही या आदेशाचे उघडपणे उल्लंघन होत असल्याचे चित्र समोर आले आहे.



अकोला शहरातील मुख्य बसस्थानकाच्या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची पुन्हा एकदा गर्दी दिसून येत आहे. पोलीस अधीक्षकांनी बसस्थानक परिसरात कोणतीही खासगी किंवा अवैध वाहतूक करणारी वाहने उभी करू नयेत, असे स्पष्ट आदेश दिले होते.

## ♦ एसपींच्या आदेशाची पायमल्ली

मात्र प्रत्यक्षात बसस्थानकाच्या आजूबाजूलाच अनेक वाहने प्रवासी भरण्यासाठी उभी राहत असल्याचे दिसत आहे.या वाहनांमुळे बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होत असून प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अधिकृत बससेवेवरही याचा परिणाम होत असल्याची तक्रार आहे. विशेष म्हणजे संबंधित यंत्रणेकडून कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.बसस्थानक परिसरात शिस्त व सुरक्षितता राखण्यासाठी दिलेल्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी आणि बसस्थानक परिसर मोकळा करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.


CLASSIFIED

विक्री किंवा भाड्याने
डॉक्टर, हॉस्पिटल, बँक, कंपनी, ऑफिस करीता उपयुक्त.
१ मजला आणि २ मजला
1800 चौरस फूट हॉल
रामेश्वर अपार्टमेंट,
श्री राजराजेश्वर कन्स्ट्रक्शन
जिल्हा परिषद शाळा क्र. 3 समोर,
जय हिंद चौक, जुने शहर,
सुसज्ज सर्व सुविधा युक्त
मुख्य रस्त्यावर आहे.
9623497321
9421940975


# प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह ?

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

## ♦ मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम

**अकोला :** मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत बाबुळगाव –गुडधी –आलियाबाद–घुसर मार्गावरील सिमेंट रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले. मात्र कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला हा रस्ता अल्पावधीतच निकृष्ट ठरल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दोन वेळा दुरुस्ती करून आणि केमिकल टाकूनही रस्त्याची अवस्था सुधारलेली नसून ठिकठिकाणी भेगा पडलेल्या दिसत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि टिकाऊ रस्ता मिळावा, या उद्देशाने हे काम हाती घेण्यात आले. मात्र प्रत्यक्षात हा रस्ता बांधल्यानंतर काहीच काळात खराब झाल्याचे समोर आले आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात भेगा पडलेल्या दिसत असून काही भागांमध्ये काँक्रिट उखडू लागले आहे. विशेष म्हणजे संबंधित विभागाकडून दोन वेळा दुरुस्तीचे काम करण्यात आले. भेगा बुजवण्यासाठी केमिकल टाकण्यात आले, मात्र



त्याचाही काहीच उपयोग झाला नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दुरुस्तीनंतरही रस्त्याची अवस्था जैसे थे असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. याशिवाय रस्त्याचे रुंदीकरणही अपुरे करण्यात आल्याची तक्रार आहे. दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात भेगांमधून पाणी झिरपल्याने रस्ता आणखी कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले का? कामाच्या दर्जावर देखरेख ठेवली गेली का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करून आणि रस्त्याचे दर्जेदार पुनर्बांधकाम करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.ग्रामीण भागाच्या विकासासाठी असलेल्या योजनेतील कामच जर निकृष्ट दर्जाचे होत असेल, तर शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन या रस्त्याची तांत्रिक तपासणी करावी आणि कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# जिल्हा स्त्री रुग्णालयासमोर पाईपलाईन फुटली

प्रतिनिधी २१ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील जिल्हा स्त्री रुग्णालयासमोर पाणीपुरवठ्याची पाइपलाइन फुटल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या ठिकाणी गड्डा खोदून ठेवण्यात आला असून रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत जाताना दिसत आहे. मात्र याकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

अकोला शहरातील जिल्हा स्त्री रुग्णालयासमोरील मुख्य रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठ्याची पाइपलाइन फुटलेली आहे. पाइपलाइन दुरुस्तीसाठी रस्त्यात गड्डा खोदण्यात आला असला तरी तो तसाच उघडा ठेवण्यात आल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.





फुटलेल्या पाइपमधून दररोज हजारो लिटर पाणी रस्त्यावरून वाहत जात असून ते थेट नाल्यात मिसळत आहे. एकीकडे शहरात पाणीटंचाईची समस्या असताना, दुसरीकडे अशा प्रकारे पाण्याची उघडपणे नासाडी होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रस्त्यावर सतत पाणी साचत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच रुग्णालय परिसर असल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना चिखल आणि पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे. यामुळे अपघाताचा धोका देखील वाढला आहे.स्थानिक नागरिकांनी महानगरपालिकेकडे वारंवार तक्रार करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन पाइपलाइन दुरुस्त करावी व रस्त्यावरील गड्डा बुजवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.


फ्लैट फ्लैट फ्लैट
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लैट
अमरावतीच्या मधोमध तेही
आपल्या बजट मधे फक्त
१६,९९,९९९/- मधे नवीन
बांधकाम मधे फ्लैट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलोनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

प्लाट प्लाट प्लाट
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या
३ सोप्या किस्ती ११ महिने
मुदत मधे प्लाट
पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK